सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ९८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ८ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## भारतीय लष्कराचा पाकमध्ये आणखी एक 'धमाका' लाहोरमधील एचक्यु-९ डिफेन्स सिस्टम केली उद्ध्वस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ नवी दिल्ली**

भारताने सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे. भारताने पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेवर हल्ला करून ती यंत्रणा उद्ध्वस्त केली आहे. यासंदर्भातील माहिती भारताच्या संरक्षण मंत्रालयाने दिली आहे. भारताच्या हल्ल्यांमध्ये क्षेपणास्त्र लॉँचर्सचेही मोठे नुकसान झाले आहे. पाकिस्तानला चीनकडून HQ-9 हवाई संरक्षण प्रणाली मिळाली आहे.



पाकिस्तानी लोक चीनच्या HQ-9 ची तुलना भारताच्या S-400 हवाई संरक्षण प्रणालीशी करतात. पण आता भारताने HQ-9 तांत्रिकदृष्ट्या S-400 समोर कुठेही टिकत नाही हे दाखवून दिले आहे. HQ-9 ची रडार प्रणाली भारताच्या ब्राह्मोस सारख्या सुपरसॉनिक क्षेपणास्त्रांना रोखू शकेल अशी जवळजवळ कोणतीही शक्यता नाही. S-400 ची मारा क्षमता ४०० किलोमीटर आहे आणि ती खूप कमी वेळात कार्यान्वित होऊ शकते.

**पाकिस्तानने हल्ल्याचा प्रयत्न केला**

भारतीय लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, भारताच्या ऑपरेशन सिंदूर नंतर चवताळलेल्या पाकिस्तानने ७ आणि ८ मे २०२५ च्या रात्री अमृतसर, अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, जालंधर, भुज, आदमपूर, भटिंडा, लुधियाना भारतीय लष्कराच्या तळावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, भारतीय सैन्याने पाकिस्तानचा हा प्रयत्न हाणून पाडला. दरम्यान, क्ट-९ ही चायना प्रेसिजन मशिनरी इम्पोर्ट-एक्सपोर्ट कॉर्पोरेशनने विकसित केलेली एक पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली आहे.

पाकिस्तानचे अलिकडचे हल्ले हाणून पाडण्यात ी-४०० ने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली. या प्रणालीने शत्रूचे ड्रोन आणि क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केले, त्यामुळे भारतीय शहरांचे कोणतेही नुकसान झाले नाही.

## चारधाम मार्ग आणि सीमाभाग 'हाय अलर्ट'वर उत्तराखंड सरकारने उचलली महत्त्वाची पावले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८देहरादून**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या ऑनलाइन बैठकीनंतर, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी त्यांच्या निवासस्थानी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली आणि राज्याच्या सर्व सीमावर्ती भागात भक्कम सुरक्षा ठेवण्याचे आणि सीमावर्ती भागात संशयास्पद हालचालींवर कडक लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले.



उत्तराखंडच्या उत्तरकाशी आणि चमोलीच्या चीनशी तर चंपावत आणि उधम सिंहच्या सीमा नेपाळशी सीमा लागून आहे, तर पिथोरागडची सीमा दोन्ही देशांशी आहे. मुख्यमंत्र्यांनी सध्या सुरू असलेल्या चार धाम यात्रेदरम्यान चारही तीर्थस्थळांच्या यात्रा मार्गावरील सुरक्षा उपाययोजना सक्रिय कराव्यात अशा सूचना दिल्या आहेत. याबाबतची माहिती सरकारी निवेदनाद्वारे देण्यात आली आहे.मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत, उत्तराखंडमधील प्रमुख आस्थापने, धरणे आणि वीज प्रकल्पांवरही चर्चा झाली. यानंतर मुख्यमंत्र्यांनी प्रशासन, सरकारी विभाग आणि पोलिसांना सतर्क राहण्यास सांगितले.

उत्तराखंडमध्ये असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थाची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी आवश्यक पावले उचलली पाहिजेत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तयार असायला हवे यासाठी जिल्हा आणि तालुका पातळीवर अन्नधान्यांसह आवश्यक वस्तूंचा पुरवठा राखला पाहिजे. रुग्णालये आणि सर्व आवश्यक औषधांची व्यवस्था निश्चित केली पाहिजे, असे निवेदनात म्हटले आहे.निवेदनानुसार, मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, नागरी सुरक्षा संस्था आणि स्वयंसेवी संस्थांना मदत आणि बचाव कार्याचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकत आहे.

## मसूद अजहरचा छोटा भाऊ कंधार प्लेन हायजॅकचा मास्टरमाईंड रौफ असगरचा हल्ल्यात खात्मा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८लाहोर**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतानेपाकिस्तानवर केलेल्या ऑपरेशन सिंदूर हल्ल्यात कुख्यात दहशतवादी रौफ असगरचा खात्मा झाल्याची माहिती पुढे आली आहे. ६ मे रोजी रात्री भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरातील ९ दहशतवादी ठिकाणांना टार्गेट करत मिसाईल हल्ला केला. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. त्यात मसूद अजहरच्या कुटुंबातील १० जणांना यमसदनी धाडले. आता रौफ असगरही हल्ल्यात ठार झाल्याची बातमी आहे.



रौफअ् असगर हा खउ-८१४ प्लेन हायजॅक जे कंधार प्लेन हायजॅक नावाने ओळखले जाते, या घटनेचा मास्टरमाईंड होता. २४ डिसेंबर १९९९ साली इंडियन एअरलाईन्सची फ्लाईट काठमांडूहून दिल्लीला येत होती. मात्र ५ दहशतवाद्यांनी या विमानाचं अपहरण केले. त्यात १७६ प्रवाशांसह १५ केबिन क्रू सदस्य होते. भारतीय इतिहासात ही सर्वात मोठी आणि भयानक घटना होती. अपहरणकर्त्या दहशतवाद्यांनी हे विमान अमृतसर, लाहोर, दुबई आणि शेवटी अफगाणिस्तानातील कंधार येथे गेले. त्याठिकाणी तालिबानीचं शासन होते.

काठमांडूच्या त्रिभुवन विमानतळावरून या विमानाने उड्डाण घेतले. त्यानंतर भारतीय हवाई हद्दीत प्रवेश करताच दहशतवाद्यांनी बंदुकीच्या धाकावर पायलटला सांगून हे विमान काबुलला नेले. लाहोरमध्ये पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी या विमानाला लँडिंगची परवानगी देत तिथे इंधन भरले. त्यानंतर विमान दुबईला पोहचले. तिथे विमानातील २७ प्रवाशांचे मृतदेह उतरवले. २५ डिसेंबरला विमान कंधारला पोहचले. तिथे तालिबानच्या मध्यस्थीने हायजॅकर्सने त्यांच्या मागण्या ठेवल्या. ज्यात ३६ दहशतवाद्यांची सुटका, २०० मिलियन डॉलरचा समावेश होता. दीर्घ काळ चर्चेनंतर भारताने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी ३ दहशतवादी सोडण्याचा निर्णय घेतला. त्यात मसूद अजहरचा जो जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख आहे, त्याच्यासोबत उमर सईद शेख, मुश्ताक अहमद जरगर याचा समावेश होता.

अब्दुल रौफ असगर हा १९९९ च्या कंधार प्लेन हायजॅकचा मास्टरमाईंड होता. मौलाना मसूद अजहरचा तो छोटा भाऊ होता. रौफने भावाला जेलमधून सोडण्यासाठी उल मुजाहिद्दीन आणि आयएसआयची मदत घेतली. भारताविरोधातील अनेक दहशतवादी कारवायात रौफचा हात होता. जैश ए मोहम्मदच्या दहशतवादी कटात त्याचा सहभाग असायचा. तो भारतातील मॉस्ट वॉन्टेड दहशतवादी होता. ज्याला ऑपरेशन सिंदूरमधून भारतीय सैन्याने ठार केले आहे.

## बिळातून बाहेर पडले, पाकिस्तानी सैन्य अधिकारी उघडपणे दहशतवाद्यांसोबत दिसले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८इस्लामाबाद**

दहशतवादाचे आम्हीही बळी आहोत, दहशतवादाविरोधात पाकिस्तान कारवाई करतो अशा खोट्या वल्गना करणाऱ्या पाकचा बुरखा पुन्हा एकदा जगासमोर फाटला आहे. ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवादी यांच्यातील कनेक्शन उघड झाले आहे. भारताच्या एअर स्ट्राईकमध्ये लश्कर ए तय्यबाच्या दहशतवादी तळावर टार्गेट करण्यात आले. त्यात अनेक दहशतवादी मारले गेले. या मृत दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्काराला सैन्याचे बडे अधिकारी पोहचले होते. भारताने केलेल्या हल्ल्यात लश्करचा दहशतवादी अब्दुल राऊफ मारला गेला त्यावेळी पाकिस्तानी सैन्याचे अनेक अधिकारी उघडपणे दहशतवाद्यांसोबत खांद्याला खांदा



लावून अंत्यसंस्काराला उपस्थित होते.

लश्कर ए तय्यबाचे मुख्यालय पाकिस्तानच्या पंजाब इथल्या मुरीदके येथे आहे. लाहोरपासून ३० किमी अंतरावर हे ठिकाण असून तिथे भारताने टार्गेट हल्ला केला. ही तीच दहशतवादी संघटना आहे जिने २००८ साली मुंबईत दहशतवादी हल्ला घडवला होता. संयुक्त राष्ट्रासह अनेक देशांनी लश्कर ए तय्यबा या दहशतवादी संघटनेवर बंदी आणली आहे. भारताविरोधात अनेक दहशतवादी कट रचण्याचं काम या संघटनेने केले आहे परंतु यावेळी भारतीय सैन्याने त्याचे मुख्यालयच उडवून टाकले. भारताच्या हल्ल्यात जैश ए मोहम्मदचा प्रमुख मसूद अजहरच्या कुटुंबातील १० जणांचा खात्मा झाला.

अब्दुल राऊफच्या अंत्यविधीला पाकिस्तानी सैन्य अधिकारी पोहचल्याने या दहशतवादी संघटना पाकिस्तानी सैन्याकडूनच चालवण्यात येतात हे उघड झाले आहे. पाकिस्तानी सैन्य जिहादच्या नावाखाली दहशतवादी संघटनांना पोसते आणि त्यांचा वापर भारताविरोधात केला जातो. परंतु दहशतवाद्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्याचा पवित्रा भारताने घेतला आहे. ही पहिलीच वेळ नाही जेव्हा पाकिस्तानी सैन्य दहशतवाद्यांसोबत दिसलेत, तर याआधीही बऱ्याचदा पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआयचे अधिकारी आणि दहशतवादी यांच्यातील कनेक्शन पुढे आले आहे. २०१२ साली मुरीदके येथे झालेल्या कार्यक्रमात माजी आयएसआय प्रमुख जनरल हामिद गुल दहशतवाद्यांसोबत व्यासपीठावर दिसले होते.

२०१२ मध्ये अमेरिकेच्या एका रिपोर्टमध्येही पाकिस्तानच्या पंजाब सरकारकडून लश्कर ए तय्यबाला धार्मिक संस्थेच्या नावाखाली कोट्यवधी सरकारी फंड दिला जात असल्याचं छापले होते. संयुक्त राष्ट्राने या दहशतवादी संघटनेला काळ्या यादीत टाकले होते तेव्हा ही मदत पंजाब सरकारने केल्याचा आरोप होता. पाकिस्तान कायम दहशतवादाला खतपाणी घालत असून अनेक दहशतवादी तिथे पोसले जातात असा आरोप भारत करते, त्या आरोपांना आजच्या समोर आलेल्या फोटो, व्हिडिओने बळ मिळाले आहे. पाकिस्तानी सैन्य अधिकारी लश्कर ए तय्यबाच्या दहशतवाद्यांसोबत दिसले हा पुरावा भारत जगासमोर मांडू शकतो.

## संकट काळात आम्ही सरकारच्या बरोबर आहोत : सर्वपक्षीय बैठकीनंतर मल्लिकार्जुन खरगेंचं वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून केलेला एअर स्ट्राईक दहशतवाद्यांचं कंबरडं मोडणारा ठरला. जैश ए मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिद्दीन या संघटनांची मुख्यालयं भारतानं या हल्ल्यात उद्ध्वस्त केली. पाकिस्तानला अद्दल घडली आणि पहलगाममधील मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला. पण याहून वेगळी अशी एक बाब या एअर स्ट्राईकमुळे अधोरेखित झाली, जी फक्त पाकिस्तानच नाही, तर अवघ्या जगानं मान्य केली! 'घर में घुस के मारा' म्हणत भारतीय हवाई दल पाकिस्तानात तब्बल १५० किमी आतपर्यंत शिरलं होतं. दरम्यान आजच सर्वपक्षीय बैठक पार



पडली.

देशाच्या हितासाठी काही विषय गुप्त ठेवण्यात आले आहेत. असं आम्हाला बैठकीत सांगण्यात आलं आहे. त्यानंतर आम्ही सगळ्यांनी सांगितलं की संकट काळात आम्ही सगळे तुमच्या पाठिंब्याशी आहोत. देशहितासाठी आम्ही तुमच्या बरोबर आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागच्या बैठकीला नव्हते आणि या बैठकीलाही नव्हते. संसदेपेक्षा आपण मोठे आहोत असं पंतप्रधानांना वाटत असेल. पण सध्याचा काळ टीका करण्याचा नाही. संकटकाळात आम्ही कुणावरही टीका करणार नाही असं खरगे यांनी म्हटलं आहे.

सर्वपक्षीय बैठकीत असलेल्या सगळ्याच पक्षांनी सरकारच्या पाकिस्तानविरोधी भूमिकेला पाठिंबा दिला आहे. या बैठकीत राजनाथ सिंह आणि किरण रिजेजू यांनी महत्त्वाची माहिती दिली. तसंच राजनाथ सिंह उपस्थितांना असंही म्हणाले की कुणाला ऑपरेशन सिंदूर बाबत माहिती किंवा इतर काही गोष्टी, मुद्दे विचारायचे असतील तर ते विचारा. ऑपरेशन सिंदूर हे अत्यंत संवदेनशील आहे त्यामुळे सगळी माहिती आम्हाला देता येणार नाही असंही सरकारतर्फे स्पष्ट करण्यात आलं. या बैठकीत मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, सुप्रिया सुळे, संजय राऊत यांच्यासह प्रमुख विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांचे नेते उपस्थित होते.

## नरेंद्र मोदींसारखेच पंतप्रधान देशाला वर्षानुवर्षे लाभो

### शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि सिद्धिविनायक न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर सिद्धिविनायक चरणी प्रार्थना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

देशबांधवांवर हल्ला करून अमानुषपणे हत्या करण्यात आली. त्याचा बदला म्हणून देशाचे पंतप्रधान आणि सैनिक यांनी जे काम केले आणि दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त केली. त्याबद्दल एक कृतज्ञता व्यक्त करावी म्हणून तसेच श्री सिद्धिविनायकाचे आशीर्वाद पंतप्रधान मोदी आणि भारतीय सैन्याला मिळावेत, यासाठी विशेष पूजा केली. आम्ही सिद्धिविनायकाच्या चरणी प्रार्थना करतो की, नरेंद्र मोदी यांच्यासारखे पंतप्रधान देशाला वर्षानुवर्षे लाभोत, अशी प्रतिक्रिया शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि सिद्धिविनायक न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर यांनी दिली.

पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निरपराध लोकांचा मृत्यू झाला होता. अनेक माताभगिनींचे कुंकू (सिंदूर) त्या दिवशी पुसले गेले. भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे अवघ्या पंचवीस मिनिटांत पाकिस्तानातील नऊ




ठिकाणचे दहशतवादी तळ क्षेपणास्त्रांचा मारा करीत उद्ध्वस्त केले, तसेच त्यातील १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केला. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरात विशेष पूजा करण्यात आली. यानंतर सदा सरवणकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.देशाचे पंतप्रधान सक्षम आहेत. ज्या पद्धतीने त्यांनी हल्ला केला, त्याला शतपटीने उत्तर देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे. भारतीय सैन्यही सामर्थ्यवान आहे. हे सामर्थ्य आणखी वाढो, हीच प्रार्थना आम्ही सिद्धिविनायक चरणी करत आहोत. सिद्धिविनायक मंदिरात लाखो भाविक येतात. हे मंदिर दहशतवाद्यांच्या यादीत असते. त्यामुळे सिद्धिविनायकाचे सगळे ट्रस्टी, प्रशासन आणि पोलीस विभाग यांनी याबाबतीत योग्य काळजी घेतलेली आहे. काही सूचना आल्यास यापेक्षाही आवश्यक उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती सदा सरवणकर यांनी दिली.

## 'जशास तसं उत्तर' ऑपरेशन सिंदूरनंतर डोनाल्ड ट्रम्प यांची भूमिका स्पष्ट; भारत-पाकिस्तान तणावावर मोठं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८वाशिंग्टन**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने बुधवारी (७ मे) पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमध्ये नऊ दहशतवादी तळांवर लष्करी हल्ले केले. भारताच्या या लष्करी कारावाईनंतर आज, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष थांबवण्याचे आवाहन केले आहे. याचबरोबर दोन्ही देशांना मध्यस्थीसाठी गरज भासली तर, त्यासाठी ते उपलब्ध असतील असे ट्रम्प यांनी म्हटले आहे.



दरम्यान, व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांनी भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाबाबत त्यांच्या भूमिकेबद्दल विचारले असता, डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, ती भयानक आहे.माझी भूमिका अशी आहे की, मी दोन्ही देशांशी सहमत आहे, दोन्ही देशांशी माझे चांगले संबंध आहेत आणि मला त्यांना या परिस्थितीतून मार्ग काढताना पहायचे आहे. मला त्यांच्यातील तणाव थांबलेला पहायचा आहे. मला आशा आशा आहे की, ते आता थांबतील. त्यांनी जशास तसे उत्तर दिले आहे, म्हणून आशा आहे की ते आता थांबतील. हा तणाव दूर करण्यासाठी जर त्यांना माझी मदत लागली तर, मी त्यासाठी उपलब्ध असेन असे ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले.

भारत व पाकिस्तान यांच्यात बऱ्याच काळापासून हा संघर्ष चालू आहे. तुम्हाला कल्पना असेल की हे अनेक वर्षं नव्हे तर शतकांपासून चालू आहे. आता मी आशा करतो की हे सगळे लवकर संपावे, अशी प्रतिक्रिया डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे.

## संपादकीय ......

# हिशेब चुकता....

*सौगंध मुझे इस मिट्टी की,*
*मैं देश नहीं मिटने दूँगा,*
*मैं देश नहीं झुकने दूँगा ।*

*प्रसिद्ध गीतकार प्रसून जोशी यांची ही कविता. भारतातील प्रत्येक सैनिकाच्या आणि देशभक्ताच्या ओठांवर हे गीत असते. पहलगाममध्ये पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निरपराध पर्यटकांचे बळी पडले. हल्ल्यानंतर अवघा देश हळहळला. त्यावेळी दहशतवाद भारताच्या आत्म्याला भेदू शकत नाही. दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्याची वेळ जवळ आली आहे. १४० कोटी भारतीयांची इच्छाशक्ती दहशतवाद्यांचे कंबरडे मोडेल. पहलगाम कटातील सर्वांना त्यांनी कल्पनाही केली नसेल, अशी मोठी शिक्षा मिळेल, असा खणखणीत इशारा पंतप्रधान मोदी यांनी दिला होता.मंगळवारी मध्यरात्रीनंतर भारताने अवघ्या २५ मिनिटांत पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करणारी 'ऑपरेशन सिंदूर' ही ऐतिहासिक मोहीम फत्ते केली. पंतप्रधानांनी राष्ट्राला दिलेले वचन खरे करून दाखवले. मुंबईवरील २६-११ नंतरचा पहलगामचा हल्ला सर्वात मोठा होता. निर्घृण होता. जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती सुरळीत होऊ लागली आणि गेल्यावर्षी तेथे सव्वादोन कोटी पर्यटक आले, हे पाकिस्तानला पाहवले नव्हते. या हल्ल्याची जबाबदारी घेणारी 'टीआरएफ' ही दहशतवादी संघटना संयुक्त राष्ट्रांनी बंदी घातलेल्या लष्कर-ए-तैयबाशी संबंधित आहे.भारताने या संघटनेबाबत गेल्या नोव्हेंबरात संयुक्त राष्ट्राला अहवाल दिला होता; पण टीआरएफचा संदर्भ काढण्यासाठी पाकिस्तान संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा समितीवर दबावही आणत आहे. पहलगाम हल्ला झाल्यानंतरही पाकिस्तानने आपल्या ताब्यातील दहशतवादी तळांवर कोणतीही कारवाई केली नाही. उलट कानावर हातच ठेवले. अशावेळी भारताने गुप्तचर यंत्रणांकडून गोळा केलेली माहिती आणि संपूर्ण परिसराचा अभ्यास करून अत्यंत अचूक, योग्य ठिकाणी, वाजवी प्रमाणात आणि जबाबादारीपूर्ण अशी कारवाई केली. या हल्ल्यात पाकिस्तानी लष्कर अथवा सर्वसामान्य नागरिक यांना लक्ष्य करण्यात आलेले नाही. केवळ दहशतवादी तळांवर अचूक नेम धरण्यात आला. या नऊपैकी चार 'टार्गेट्स' ही पंजाब प्रांतातील व पाच पाकव्याप्त काश्मीरमधील आहेत.*

*पाकिस्तानात थेट १०० किलोमीटर आत घुसून स्काल्प क्षेपणास्त्रे डागून, जो लक्ष्यभेद करण्यात आला तो स्पृहणीय आहे. लष्कर-ए-तैयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिदीन या सर्व प्रमुख संघटनांचे तळ आणि त्यांची मुख्यालये बेचिराख करण्यात आली असून, ही अद्दल घडवणे अतिशय गरजेचेच होते. भारतीय संसद, पठाणकोट, उरी, पुलवामा, गुलमर्ग, सोनमर्ग अशा ठिकाणी पाकिस्तानने वारंवार हल्ले केले. जिहादी दहशतवाद्यांनी ऑगस्ट २००० मध्ये अमरनाथ यात्रा करणार्या ३० भाविकांना ठार मारले. जम्मू-काश्मीरमधील कालुचक तसेच कासिमनगर येथे बॉम्ब फेकून ४०-५० हिंदूंचे बळी घेतले. त्यापूर्वी २४ डिसेंबर १९९९ला इंडियन एअरलाईन्सच्या काठमांडूहून दिल्लीकडे निघालेल्या प्रवासी विमानाचे अपहरण करून, ते अफगाणिस्तानातील कंदाहार येथे नेण्यात आले.अपहृतांना सोडण्याच्या बदल्यात भारतीय तुरुंगात असलेल्या ३६ दहशतवाद्यांची सुटका करण्याची आणि २० कोटी डॉलर देण्याची मागणी दहशतवाद्यांनी केली होती. ज्यांची सुटका करावी लागली, त्यात मौलाना मसूद अझरसारख्या म्होरक्याचा समावेश होता. सुटकेनंतर मसूदने जैश-ए- मोहम्मद संघटनेमार्फत भारतावर दहशतवाद्यांमार्फत वारंवार हल्ले घडवले. या सर्व पापांचा हिशेब आता भारताने एकाच फटक्यात चुकता केला. यापूर्वी भारताने सर्जिकल स्ट्राईक केला होता, त्याचप्रमाणे बालाकोटमध्ये हवाई हल्लाही केला होता; पण यावेळचा हल्ला अधिक व्यापक असून, त्याचे सर्व पुरावे पत्रकार परिषद घेऊन जनतेपुढे ठेवण्यात आले, हे महत्त्वाचे! पहलगाम हल्ला झाल्यानंतर सरकार कारवाई का करत नाही, असा प्रश्न विरोधक सातत्याने विचारत होते. पहलगामचा सूड घ्यावा, अशी सर्वांचीच भावना होती; परंतु कोणत्याही सरकारला केवळ भावनांवर स्वार होऊन चालत नाही. भारताने युद्ध करावे, अशी मागणी करणे सोपे आहे; पण युद्धाची किंमत मोठी असते. याउलट भारताने जशास तशी कारवाई केली. 'ऑपरेशन सिंदूर' पूर्वी पंतप्रधानांनी लष्कर, नौदल व हवाई दल यांच्या प्रमुखांशी तसेच सल्लागार अजित डोवाल यांच्याशीही पुन्हा पुन्हा चर्चा केली. त्यानंतरच नियोजनबद्धरीत्या रात्रीची वेळ निवडून अचूक लक्ष्यभेद केला. पहलगाममध्ये धर्म विचारून दहशतवाद्यांनी हिंदूंची हत्या केली; मात्र त्यास उत्तर देताना भारताने केवळ दहशतवाद्यांना मारणे, एवढाच उद्देश ठेवला होता, हे लक्षात घेण्यासारखे आहे. या कारवाईचे सर्व पुरावे सादर करण्यात आले असल्यामुळे बालाकोटप्रमाणे विरोधकांनी पुरावे मागण्याचा क्षुद्रपणा करू नये.पकिस्तानला अद्दल घडवणार्या आपल्या सैन्यदलांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच. पंतप्रधानांनी योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार सेनादलांना दिलेले होतेच; पण शेवटी या कारवाईची व परिणामांची जबाबदारी ही नेतृत्वाकडेच येते. इंदिरा गांधींप्रमाणेच मोदी यांचे नेतृत्व आक्रमक आणि जोखीम घेणारे आहे. भारताने हल्ला केल्यास आम्ही अणुयुद्ध करू, रक्तपात करू अशा वल्गना पाकिस्तानचे संरक्षणमंत्री तसेच अन्य नेत्यांनी केल्या होत्या; मात्र प्रत्यक्ष हल्ला झाल्यानंतर पाक सरकारची भीतीने गाळण उडाली आहे. भारताने यापुढे कारवाई केली नाही, तर आम्हीही कारवाई करणार नाही, असे म्हणून पाक नेतृत्व स्वतःची सुटका करून घेऊ पाहत आहे.*

*पाकिस्तानचे लष्करप्रमुख मुनीर यांनी हिंदू-मुस्लिम द्विराष्ट्र सिद्धांताची आठवण करून दिली होती. त्यानंतरच पहलगामकांड घडले. भारताच्या या ठोस कारवाईत मशिदी व प्रशिक्षण केंद्रांमधून धार्मिक विद्वेषाची जी कोठारे तयार केली जात आहेत, त्यांनाच भारताने काडी लावली. पाकिस्तानकडे अण्वस्त्रे आहेत आणि त्यामुळे अणुयुद्ध होईल, या भीतीपोटी अथवा चीनच्या दडपणापायी यापुढे भारत हातावर हात ठेवून स्वस्थ बसणार नाही. अमेरिकेनेही पाकिस्तानला ठणकावले आहे. हा नवा, समर्थ भारत आहे. दहशतवाद केवळ पाकिस्तानातूनच नाही, तर जगातून समूळ नष्ट व्हावा, यासाठी भारत कटिबद्ध असल्याचा संदेश 'ऑपरेशन सिंदूर'ने दिला आहे.*

# बारावीच्या पुरवणी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी १७ मे पर्यंत आवेदनपत्रे भरावीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी.) फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेचा निकाल दि.५ मे २०२५ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (फेब्रु-मार्च २०२५, परीक्षेस प्रविष्ट न झालेले) व जून-जुलै २०२५ परीक्षेसाठी नावनोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणारे विद्यार्थी, आय टी आय विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे ट्रान्सफर ऑफ क्रेडिट घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पदध्दतीने घेण्यात येणार आहेत. परीक्षेत प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इयत्ता १२ वी. साठी ु.ारहरहीललेरीव.ळप या संकेतस्थळावर भरावयाची आहेत.आवेदनपत्रे भारावयासाठी च्या तारखा पुढील प्रमाणे आहेत. नियमित शुल्क :बुधवार, ७ मे २०२५ ते शनिवार, १७ मे २०२५ पर्यंत, विलंब शुल्क १८ मे २०२५ ते गुरूवार, २२ मे २०२५पर्यंत तसेच उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी




आरटीजीएस/एनईएफटी द्वारे रक्कम भरावयाची तारीख शुकवार २३ मे २०२५ पर्यंत आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पावती/ चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे सोमवार २६ मे २०२५ रोजी जमा करावयाची आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरून सादर केल्यानंतर आवेदनपत्रे भरावया च्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन मधून प्रीलिस्ट उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांनी स्वाक्षरी घ्यावी, त्याचप्रमाणे पडताळणी केल्याबाबत उच्च माध्यमिक शाळा प्रमुख/प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी. १२ वी. परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिकः शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी पुढील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहेत. ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्याची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल. श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करू इच्छिणाऱ्या फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जून-जुलै २०२५, फेब्रु-मार्च २०२६ व जून-जुलै २०२६ अशा लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ द्वारे प्राप्त ऑनलाईन चलनावर नमूद केलेल्या आयसीआयसी आय बँकेच्या व्हर्च्यअल खात्यामध्ये कोणत्याही बँकेमधून व्दारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा. यापूर्वी वापरात असणाऱ्या बँक ऑफ इंडिया/ एचडीएफसी बँक/ क्सिस बँक च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही. उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आनेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.




## वयाच्या चाळिशीतही दिसाल तरुण! ५ पदार्थ वाढवतात त्वचेचे सौंदर्य, सुरकुत्या-डार्क सर्कलच्या समस्या गायब

**दि.८ विदर्भ प्रजासत्ताक**

वय ओलांडू लागले की चेहऱ्यावर सुरकुत्या-डार्क सर्कलची समस्या सतावू लागते. या काळात त्वचा घट्ट होण्याऐवजी ती सैल पडते. ज्यामुळे चेहऱ्याचे सौंदर्य बिघडते.



चेतील कोलजन कमी झाल्यावर वाढत्या वयानुसार आपले तरुणपण कमी होऊ लागते. कोलजनमुळे आपली त्वचा घट्ट आणि तरुण राहते.

जर आपणही चाळीशीत पदार्पण करत असू तर नैसर्गिकरित्या कोलेजनचे उत्पादन वाढवणारे पदार्थ आहारात असायला हवे यामुळे त्वचेचे सौंदर्य कायम टिकून राहते.

जर आपणही चाळीशीत पदार्पण करत असू तर नैसर्गिकरित्या कोलेजनचे उत्पादन वाढवणारे पदार्थ आहारात असायला हवे यामुळे त्वचेचे सौंदर्य कायम टिकून राहते.

सोया उत्पादनांमध्ये टोफू आणि सोया दूध हे फायदेशीर आहे. यामुळे वाढत्या वयात येणारे अकाली वृद्धत्व रोखण्याचे गुणधर्म असतात.

बदाम हे कोलेजनसाठी चांगले आहे. यामध्ये व्हिटॅमिन ई असते जे त्वचेचे संरक्षण करते आणि त्वचा दुरुस्त करण्याचे काम करते.

व्हिटॅमिन सी मध्ये कोलेजन उत्पादनासाठी आवश्यक असणारे पोषक तत्व आढळतात. त्यासाठी आहारात संत्री, मोसंबी, लिंबू आणि शिमला मिरची खा.

चिकन आणि मांसमध्ये असणारे घटक कोलेजन वाढवण्यास मदत करतात. चिकनचा रस्सा हा कोलेजनचा पॉवर हाऊस मानला जातो.वयाच्या चाळिशीतही दिसाल तरुण! ५ पदार्थ वाढवतात त्वचेचे सौंदर्य, सुरकुत्या-डार्क सर्कलच्या समस्या गायब०८

सकाळी रिकाम्या पोटी लिंबू पाणी प्यायल्याने कोलेजन संश्लेषणात मदत करते. यामुळे पचनक्रिया सुधारते.

# महिलांना मिळणार मोफत पिठाची गिरणी; लाभार्थी होणार आत्मनिर्भर

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोफत पीठ गिरणी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना मोफत पिठाची गिरणी मिळते. यातून त्यांना स्वत: चा व्यवसाय सुरू करता येतो. आर्थिक अडचणीत असलेल्या महिलांना मदत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोफत पीठ गिरणी योजना २०२४ मध्ये सुरू केली आहे. ही योजना या महिलांना मोफत पिठाच्या गिरण्या आणि त्यांना स्वतःचा छोटासा व्यवसाय सुरू करता येतो.महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती आणि जमातीतील महिलांना पिठाची गिरणी खरेदी करण्यासाठी अनुदान देत आहे. या योजनेमुळे महिलांना स्वतः चा व्यवसाय सुरू करण्यास मदत मिळते आहे. या योजनेमुळे कमी भांडवल गुंतवावे लागते.पिठाची गिरणी हा असा व्यवसाय आहे, ज्यामध्ये कमी गुंतवणुकीत चांगला नफा मिळवता येतो. ग्रामीण भागात दररोज धान्य दळण्याची गरज असते, त्यामुळे हा व्यवसाय वर्षभर चालू राहतो. या योजनेअंतर्गत महिलांना गिरणी खरेदीसाठी ९०% सरकारी अनुदान दिले जाते. म्हणजेच, महिलांना फक्त १०% रक्कम भरावी लागते. यामुळे अगदी कमी खर्चात व्यवसाय सुरू करता येतो. विशेषतः आदिवासी आणि मागासवर्गीय महिलांसाठी ही योजना फायदेशीर आहे.

**मोफत पिठाची गिरणी योजनाची उद्दिष्टे**

**महिलांचे आर्थिक सक्षमीकरण** : महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवून त्यांचे सशक्तीकरण करणे.

*ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना : ग्रामीण भागात लघु उद्योगांना प्रोत्साहन देऊन स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे.

*रोजगार निर्मिती : महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

*सामाजिक समता : अनुसूचित जाती आणि जमातीतील महिलांच्या आर्थिक विकासाला चालना देऊन सामाजिक समता आणणे.

*कौटुंबिक उत्पन्न वाढवणे : महिलांच्या उत्पन्नातील वाढीमुळे कुटुंबाचे एकूण उत्पन्न वाढवणे.

***योजनेचे पात्रता निकष**




**काय?**- अर्जदार महिला महाराष्ट्राची रहिवासी असावी.

*अर्जदार महिलेचे वय १८ ते ६० वर्षे दरम्यान असावे.

*महिला अनुसूचित जाती किंवा जमातीमधील असावी.

*कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १.२० लाख रुपयांपेक्षा कमी असावे.

*विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना प्राधान्य दिले जाईल.

*अर्जदार महिलेच्या नावे बँक खाते असणे आवश्यक आहे.




*योजनासाठी आवश्यक कागदपत्रे

* अर्जदार महिलेच्या आधार कार्डची प्रत

* अनुसूचित जाती किंवा जमातीचे प्रमाणपत्र.

* कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला.

* कुटुंबाच्या रेशन कार्डची प्रत.

* महाराष्ट्राचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र.

* बँक खात्याचा तपशील पासबुक किंवा बँक स्टेटमेंटची प्रत.

* अर्जदार महिलेचा अलीकडील फोटो.

* दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र (असल्यास): इझङ कार्डची प्रत.

* कोटेशनः पिठाची गिरणी खरेदी करण्यासाठी शासनमान्य विक्रेत्याचे कोटेशन.

**येथे करा अर्ज**

*अर्जदार महिलेने स्थानिक पंचायत समिती किंवा जिल्हा महिला व बालकल्याण विभागाच्या कार्यालयात जाऊन अर्ज भरावा.

* सर्व आवश्यक माहिती भरून अर्ज पूर्ण करावा.

* वर नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत.

* पूर्ण भरलेला अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह संबंधित कार्यालयात सादर करावा.

* अर्जाची पडताळणी केली जाईल आणि पात्रता तपासली जाईल.

* अर्ज मंजूर झाल्यास, संबंधित महिलेला अनुदान मंजूर केले जाईल.

* मंजूर अनुदान थेट अर्जदार महिलेच्या बँक खात्यात जमा केले जाईल.

**पिठाची गिरणी व्यवसायाचे फायदे**

* ग्रामीण भागात पिठाच्या गिरणीची गरज वर्षभर असते, त्यामुळे नियमित उत्पन्न मिळू शकते.

* सरकारी अनुदानामुळे महिलांना अत्यंत कमी गुंतवणुकीत व्यवसाय सुरू करता येईल. दररोज धान्य दळण्याची स्थानिक गरज असल्याने व्यवसायाला मागणी असते.

# पुढील तीन दिवस पावसाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अकोला**

अकोला भारतीय हवामान खात्याचा अंदाजानुसार अगोदर दिनांक ७ ते ९ मे २०२५ दरम्यान विजाच्या कडकडाटा सह पाऊस होण्याचा अंदाज आला आहे. त्यानुषंगाने प्रगती काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि ढगांच्या गडगडाट पडून विजा आणि पावसाची गती वर्त आणली आहे. तरीसुद्धा सर्व मुस्लिमांना आग्रहाने आग्रह करणे आवश्यक आहे, अशा कारणास्तव घरावर पडू नका. तसेच जनावरांना झाडांना किंवा विजेच्या वायरीच्या खाली बांधू नका. खाली दामिनी पचा वापर करा. दामिनी हे असे तुम्हाला आहे की, ७ मिनिट १४ मिनिट



आणि २१ मिनिट आधी वीज पडण्याची सूचना देते. त्या सूचना तुमच्या स्वतःचा आणि इतरांचा जीव वाचवा किंवा आपचा वापर करू शकता. हे आपचे हे पृथ्वी आणि विज्ञान मंत्रालय सरकारच्या माध्यमातून विकसित करण्यात आले आहे. गुगल प्ले स्टोअरमधून प डाऊनलोड करतांना वार, या दरम्यान सर्व यंत्रणा कार्यक्षमता, असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन कक्ष कक्ष कार्यालय, अकोलाकडून करण्यात येत आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील निर्लेखित वस्तूंचा लिलाव

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.८अमरावती** जिल्हाधिकारी कार्यालयातील निर्लेखित करण्यात आलेले फर्निचर, लाकडी लोखंडी खुर्चींचा लिलाव करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी दि. १४ मे पर्यंत निविदा सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी कार्यालयातील जुन्या निर्लेखित शासकीय कालबाह्य झालेल्या विविध प्रकारच्या २३७ खुर्च्या जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे. सदर साहित्य हे आहे, त्या स्थितीमध्ये विक्री करण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती जिल्हा प्रशासनाच्या रीरींरीं.पळल . ळपसंकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी साहित्य पाहून निविदेत सहभागी व्हावे, असे आवाहन अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दाणेज यांनी केले आहे

# चेन्नई-भगत की कोठी रेल्वेची बडनेराहून सेवा

## चंद्रपूर, बल्लारशाकडे जाणाऱ्यां प्रवाश्याना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-**प्रवाशांच्या सुविधेसाठी रेल्वे प्रशासनाने चेन्नई सेंट्रल ते भगत को कोठी दरम्यान नवीन रेल्वे सेवा सुरू केल्यामुळे बडनेराहून गुजरात व राजस्थानला जाण्यासाठी प्रवाशांना आठवड्यातून पाच दिवस अतिरिक्त सुविधा मिळाली आहे. ५ मे रोजी या सुपर फास्ट एक्स्प्रेसचा शुभारंभ झाला.

गाडी क्र.२०६२५ चेन्नई सेंट्रल ते भगत की कोठी एक्स्प्रेस सोमवार, ५ मेपासून आठवड्यातून ५ १५ दिवस (बुधवार आणि शनिवार वगळता) चेन्नई सेंट्रल येथून रात्री ७.४५ वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी दुपारी १२.१५ वाजता भगत की कोठी येथे पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्र. २०६२६ भगत की कोठी ते चेन्नई सेंट्रल एक्स्प्रेस बुधवार ७ मेपासून आठवड्यातून ५ दिवस (शनिवार आणि मंगळवार वगळता) भगत की कोठी येथून पहाटे ५.३० वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री ११.१५ वाजता चेन्नई सेंट्रल येथे पोहोचणार आहे.मार्गात ही एक्स्प्रेस सुल्लुरूमेटा, गुडूर, नेल्लोर, ओंगोल, विजयवाडा, खम्मम, वारंगल, बल्लारशाह, चंद्रपूर, वर्धा, धामणगाव, बडनेरा, अकोला, मलकापूर, भुसावळ, जळगाव, नंदुरबार, उधना, अंकलेश्वर, वडोदरा, आनंद, साबरमती, मेहसाणा, पाटण, भीलडी, राणिवाडा, मारवाड भीनमाळ, मोडरान, जालोर, मोकलसर, समडडी, लुणी हे थांबे घेणार असल्याचे सांगण्यात आले.(कलर बॉक्स)चंद्रपूर, बल्लारशाकडे जाणयऱ्यांना दिलासा



बडनेराहून विदर्भातील चंद्रपूर, बल्लारशाकडे जाण्यासाठी फारच कमी एक्सप्रेस रेल्वे आहेत. त्यामुळे नवजीवनसारख्या नियमित धावणाऱ्या एक्स्प्रेसमध्ये आरक्षण व जागा मिळत नाही. परिणामी प्रवाशांना बडनेराहून वर्षा, सेवाग्राम व तेथून चंद्रपूर, बल्लारशाकडे जावे लागते. भागत की कोठी ते चेन्नई सेंट्रल एक्स्प्रेसमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही आठवड्यातून पाच दिक्स धावणार आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ८ मे २०२५ शहर/ग्रामिण

# पत्रकारांनी घेतले कृत्रिम बुद्धिमत्तेचे धडे

## दर तीन महिन्याने होणार कार्यशाळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती–**

एमकेसील व अमरावती श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने बुधवारी सकाळी आयोजित कार्यशाळेत शहरातल्या पत्रकारांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे धडे घेतले. या स्वरूपाची कार्यशाळा दर तीन महिन्याने नव्याने येणार्या माहितीसह घेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

पत्रकारितेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) उपयोगिता या विषयावर ही दोन तासांची नि:शुल्क कार्यशाळा शेगाव नाका चौकातील मुराई मार्केटमध्ये असलेल्या नॅसकॉम कॉम्प्युटर्समध्ये घेण्यात आली. सर्वप्रथम माँ रसस्वती पूजन एमकेसीएलचे विभागीय समन्वयक देवेंद्र पाथरे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष

### एमकेसीएल व श्रमिक पत्रकार संघाचा पुढाकार

गोपाल हरणे, नॅसकॉमचे संचालक जयेश मालविय, जयंत लोही, निकेश सोनी यांच्याहस्ते करण्यात आले. पत्रकार संघाचे उपाध्यक्ष अमोल इंगोले, सचिव रवींद्र लाखोडे, सहसचिव प्रदीप भाकरे, कृष्णा लोखंडे यांनी कृतज्ञता म्हणून एमकेसीएल व नॅसकॉमच्या अधिकार्यांचा सत्कार केला.

सुरूवातीला देवेंद्र पाथरे यांनी जगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कशा पद्धतीने होत आहे आणि आपल्यासाठी ती कशी उपयोगात येऊ शकते याची माहिती दिली.

जयेश मालविय यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी भाषिनी, चॅटजीपीटी, नेऊरल रार्यटर, अडोब फायरफ्लाय, क्लिलबॉट, विगल हे टुल्स कसे वापरायचे याची माहिती देऊन त्याचे प्रात्याक्षिक करून दाखविले. त्यात भाषांतर, लेखासाठीचे मुद्दे, बातम्यांसाठी आवश्यक तांत्रिक माहिती, मथळे, संकल्प चित्र, व्हीडीओ याचा समावेश होता. देवेंद्र पाथरे यांनी ते अधिक सोप्या भाषेत सविस्तरपणे समजून सांगताना सायबर सुरक्षितता कशी बाळगावी याची माहिती दिली. यावर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दोघांनी दिली. पत्रकार व संगणक परिचालक यांच्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरली. संचालन पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर यांनी केले. कार्यशाळेला मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

# नांदगाव तहसील कार्यालयात निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची हेळसांड

## पाच महिन्यापासून पगार थकल्याने लाभार्थी मारतात कार्यालयात चकरा

### संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयातून नायब तहसीलदारसह कर्मचारी गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नांदगाव खंडेश्वर**

मागील पाच महिन्या पासून निराधार योजनेच्या पगारापासून वंचीत असलेल्या तीन हजार लाभार्थ्यांना तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयात चकरा मारा लागत असून कार्यालयात मात्र नायब तहसीलदारासह इतर कर्मचारी गायब असल्याने याची दखल घेऊन शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांनी धडक देऊन लाभार्थ्यांची होत असलेली हेळसांड पाहुन लाभार्थ्यांसहा तहसीलदारांना घेराव घेऊन तात्काळ कर्मचारी वाढवण्याची मागणी केली. शासनाने संजय गांधी निराधार योजना, वृद्धकाळ योजना,



दिव्यांग या योजनेच्या लाभार्थ्यांचे आधार बेस पगार केल्याने थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याच्या आधार प्रमाणी करणाच्या पासून वंचित असलेले लाभार्थी तहसील कार्यालयात आधार प्रमाणीकरणाकरता आठ दिवसांपासून तहसील कार्यालयात चकरा मारत आहे. मात्र निराधार योजना विभागाचे कार्यालयातून नायब तहसीलदारासह इतर कर्मचारी गैरहजर होते शेकडो लाभार्थी पाच तासांपासून कार्यालयात तात्कळत होते सादि पाण्याची व्यवस्था सुद्धा नव्हती लाभार्थ्यांची हेडसांड होताना दिसून आली याची माहिती मिळताच शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी तहसील कार्यालय गाठून सर्व लाभार्थ्यांची पिण्याच्या पाण्याची सोय करून सर्व लाभार्थ्यांसह तहसीलदारांच्या कक्षात धडक देऊन आधार प्रमाणीकरणाकरता तात्काळ कर्मचारी वाढवण्याची मागणी केली त्यावर तहसीलदारांनी तीन कर्मचाऱ्यांची लगेच नियुक्ती केली.

खासदार काळे यांचा व्हिडिओ कॉल द्वारे लाभार्थ्यांची संवादतहसील कार्यालयात निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची हेळसांड होत असल्याची माहिती प्रकाश मारोटकर यांनी दूरध्वनी वरून खासदार काळे यांना देताच त्यांनी व्हिडिओ कॉल द्वारे थेट लाभार्थ्यांची संवाद साधला व आधार प्रमाणीकरणासाठी तात्काळ कर्मचारी वाढविण्यात यावे असे निर्देश तहसीलदार यांना दिले.–

# चंद्रपूर येथील राहत्या घराला आग

## आगी मध्ये जीवनावश्यक वस्तू जळून खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८दर्यापूर–** दर्यापूर तालुक्यातील एका गावामध्ये राहत्या घराला भीषण आग लागली ज्यामध्ये संपूर्ण जीवन आवश्यक वस्तू जळून खाक झाले आहे.सुदैवाने घरामध्ये कोणी नसल्यामुळे मोठी जीवितहानी टाळली. घटनास्थळी स्थानिकांनी आगीवर नियंत्रण मिळवले असून अग्निशामक दलाचे वाहन तसेच खल्लार पोलीसांनी धाव घेतली. तालुक्यातील चंद्रपूर येथील इंदिरा आवास परिसरामध्ये राहणाऱ्या संदीप गावंडे यांच्या राहत्या घराला बुधवार ७ मे रोजी संध्याकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात भीषण आग लागली. आग इतकी भीषण होती की घरामध्ये असलेल्या



जीवनावश्यक वस्तू संपूर्णतः जळून खाक झाले. संदीप गावंडे यांच्या परिवारात पती–पत्नी मुलगा मुलगी आहेत. यामध्ये मुलगा व वडील बाजारात गेले असून,आई तसेच मुलगी शेजाऱ्यांकडे कामानिमित्त गेले होते. संध्याकाळी साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास गावंडे यांच्या घराला भीषण आग लागली. आग लागली समजतात स्थानिकांनी आपापल्या घरातून पाण्याच्या बादल्या घेऊन आग विझविनयाकरिता धाव घेतली. यावेळी गावचे सरपंच डॉ चंचल गजभिये व पोलीस पाटील महेंद्र मेश्राम घटनास्थळी पोहोचून अग्निशामक दलाला प्रचारण केले असता अग्निशामक दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले. उर्वरित अगीवार नियंत्रण मिळवले.

# अ.भा.साहित्य महामंडळाचे १०० वे साहित्य संमेलन अमरावतीत

## खासदार डॉ. अनिल बोंडे यांची संकल्पना, साहित्यिकांची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती** – अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे जानेवारी २०२७ मध्ये होऊ घातलेले साहित्य संमेलन हे मराठी साहित्याची जन्मभूमी असलेले व प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज यांची नगरी अर्थात चांदूरबाजार–रिद्धपूर येथे घेण्याचा बेत आहे. राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या साहित्य संमेलनासाठी साहित्यिकांची बैठक बुधवारी (७ मे) पार पडली. या बैठकीला साहित्य क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावतीचे अध्यक्ष विलास मराठे, सचिव माधव पांडे, डॉ. मोना चिमोटे, डॉ. वर्षा चिखले, ॲड. राजेंद्र पांडे, प्रा. राजेंद्र राऊत, प्रा. वानखडे, संजय पाखोडे, शुभम बायस्कार यांच्यासह अन्य या बैठकीला उपस्थित होते. अमरावती जिल्हा हा प्रज्ञाचक्षु संत गुलाबराव महाराज, महानुभाव पंथीयांची काशी, मराठी साहित्याची जन्मभूमी अशी ओळख आहे. अलीकडेच रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठाची देखील स्थापना करण्यातआली आहे. अमरावती जिल्ह्याचे मराठीचे वैभव हे फार मोठे आहे. ही बाब लक्षात घेता अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे शंभरावे मराठी साहित्य संमेलन अमरावतीत व्हावे, अशी संकल्पना खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी साहित्यिकांसमोर




मांडली. ही संकल्पना साहित्य संघाचे अध्यक्ष विलास मराठे, सचिव माधव पांडे यांनी उचलून धरली. त्यानुषंगाने आगामी काळात शंभरावे मराठी साहित्य संमेलन अमरावतीत व्हावे, यासंदर्भातील हालचाली सुरू झाल्या आहेत. यासाठी समाजातील सर्व घटकातील संस्था नागरिक यांचा यामध्ये सहभाग घेतला जाणार आहे. या साहित्य संमेलनासाठी विदर्भ साहित्य संघाच्या अमरावती शाखेद्वारे देखील ठराव घेऊन तो विदर्भसाहित्य संघ नागपूर यांना पाठवला जाणार आहे. रिद्धपूर–चांदूरबाजार येथील नियोजित जागेची देखील साहित्यिकांकडून पाहणी केली जाणार आहे. जूनमध्ये साहित्य संघाचे पदाधिकारी या दोन्ही ठिकाणी भेटी देऊन या संदर्भातील प्रस्ताव विदर्भसाहित्य संघाच्या केंद्रीय कार्यकारणी समोर सादर करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. पुढे तो अखिलभारतीय मराठी साहित्य महामंडळाला पाठवला जाणार आहे. एकंदरीतच २०२७ मध्ये होऊ घातलेल्या या साहित्य संमेलनाची अमरावतीतील साहित्य विश्वाकडून जंगी तयारी देखील सुरू करण्यात आली आहे. तसेच रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संत गुलाबराव महाराज भक्तीधाम संस्थ चांदूरबाजार, अखिल भारती महानुभाव पंथ यांच्यासह विविध संस्थांना यामध्ये सहभागी करू घेतल्या जाणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

# मेळघाटात बांबुला आला फुलोरा

## बियाणे संकलीत करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.८ हतरु (मेळघाट)** – मेळघाटच्या उत्तरी सिमेच्या जंगलात मोठ्या प्रमाणात बांबुच्या झाडांना फुलोरा आल्याने जंगलाचे रंग बदलेले आहे. बांबुला फुले लागलेली पाहून पुरातन मनगढत मान्यतांचा पगडा असलेल्या लोकांमध्ये अंध विश्वासाची चर्चा सुरू झालेली आहे. तर पर्यावरण प्रेमींनी बियाणे संकलीत करून उपयोग करण्याची मागणी केलेली आहे. मेळघाटातील जारिदा ते हतरू आणि बिबामार्गावरील दोन्ही बाजूलाबांबुच्यारांझी आहेत. सुमारे ५० वर्षानंतर या बांबुच्या झाडांना आकर्षक फुले लागलेली असून सुकल्यानंतर फुला मधील बियाणे खाली जमिनीवर पडतील. वन विभागा व्दारे या बियाणंना एकत्रित करून इतरत्र रोपीत करण्याची गरज आहे. खोज संस्थेचे ॲड. बंडया साने यांनी बांबुच्या फुलांचा विषयी माहिती देतांना मागणी केली की बांबुच्याबियाणंना संकलीत करून नर्सरित रोपे तयार करून गर्जु शेतकऱ्यांना किंवा बांबुच्या वस्तु तयार करण्याच्या कारागिरांना पेरणीसाठी देण्याची मागणी केलेली आहे.



फुलोरा म्हणजे बांबुचा अंत असतो. एका माहितीप्रमाणे बांबुच्या झाडांना ५० ते ७० वर्षानंतर फुलोरा येतो. फुलोरा येणे म्हणजे बांबुच्या झाडांचा अंत असतो. म्हणून ग्रामीण भागातअपशगून पण मानला जातो. विशेष म्हणजो बांबुचे फुलगोलाकार व विक असतात. बांबुला फुलोरा येताच उंदिरमात्र झाडाखाली बसून बियाण्याची वाट पाहतात. बियाणे संपल्यावर उंदिरइकडे–तिकडे धावूनशेतीचे नुकसान करतात. उंदिरांनाबी फार आवडीचे असते. बांबुचे जंगलसुकल्यानंतर जंगलाचा रंग विषन्त्रता प्रदान करत असल्याने कदाचित फुलोरा आल्यास ग्रामीण भागात अपशगुन मानला जात असावा. बिज अंकुरे तत्वावर बांबुच्या बियाण्यांचे संकलन करून उपयोग करण्याची गरज आहे. बांबुला लाकडाचा, पाय म्हणून मान्यता असून बांबुची कच्ची घरे भुकंपात सुध्दा उपयोगी ठरतात. त्यामुळे बियाणांचा पुन्हा वापर करण्याची योजना वनविभागाने अमंलात आणली आहे.–

# राज्यात आजपासून ‘हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बस स्थानक अभियाना’ ला सुरुवात

## विजेत्या बस स्थानकाला १ कोटी रुपयांचे बक्षीस देणार,

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती–** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधत आज गुरुवारपासून पुढील वर्षभर एसटीच्या राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत तीन कोटी रुपयांची बक्षिसे वाटण्यात येणार असून राज्यात ‘अ’ वर्गात पहिला येणाऱ्या बसस्थानकाला एक कोटीचे बक्षीस देण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी येथे दिली.

वर्षभर चालणाऱ्या या अभियानामध्ये दर तीन महिन्यांनी प्रत्येक बसस्थानकाचे मूल्यमापन होणार आहे. त्यासाठी एस.टी. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली परीक्षण समित्या नेमण्यात आल्या असून त्यांनी दिलेल्या गुणांच्या आधारे सरासरीद्वारे बस स्थानकाचे क्रमांक निश्चित करण्यात येतील. राज्यभरातील एसटी बस



स्थानकाचे तेथील प्रवासी चढ–उतार संख्येच्या आधारे शहरी ‘अ’ वर्ग, निमशहरी ‘ब’ वर्ग आणि ग्रामीण ‘क’ वर्ग अशा तीन गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे.

सुरुवातीला प्रादेशिक स्तरावर प्रत्येक गटनिहाय पहिला, दुसरा आणि तिसऱ्या क्रमांकासाठी स्पर्धा रंगणार असून अंतिम स्पर्धा राज्यस्तरावर घेण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक प्रादेशिक स्तरावर गटनिहाय पहिला आलेल्या बसस्थानकाचा विचार केला जाणार आहे. राज्यपातळीवर ‘अ’ वर्ग गटातून पहिल्या येणाऱ्या बसस्थानकाला १ कोटी रुपये, ‘ब’ वर्ग गटातून प्रथम येणाऱ्या बसस्थानकाला ५० लाख रुपये तर ‘क’ वर्ग गटातून अव्वल ठरणाऱ्या बसस्थानकाला २५ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

# गोपाल नगरातील ज्योती कॉलनीतील देवांशु फरकाडे हत्याकांडात पाच आरोपींना अटक

## अटकेतील २ अल्पवयीन, तीन अल्पवयीन फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

गेल्या अनेक दिवसापासून सुरू असलेली खुन्नस इंस्टाग्रामच्या पोस्टवर अजूनच भडकल्याने तब्बल ८ जणांनी घेऊन गोपाल नगरात देवांशू फरकाडेची हत्या केली होती. या बाबत राजापेठ पोलिसांनी आतापर्यंत पाच आरोपींना अटक केली आहे. आरोपींमध्ये दोन अल्पवयीनचा समावेश आहे. तर अन्य तीन अल्पवयीनआरोपी फरार असून शोध सुरु आहे. हर्षद जाधव (१८) रा.माया नगर, राज आठवले (२०), ओम खडसे (१८) दोन्हीरा. ज्योती कॉलनी, दोन अल्पवयीन अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तर मृतकचे नाव देवांशू अनिल फरकाडे (२२) असे आहे. माहितीनुसार, गोपाल नगर भागातील रहिवासी देवांशू फरकाडे याचा वरील नमूद व इतर आरोपींसह कोणत्यातरी कारणावरून बराच जुना वाद सुरू होता. मध्यतरीच्या काळात इंस्टग्रामवर आरोपी व देवांशू बघून घेण्याची धमकी देण्याच्या पोस्ट एकमेकांविरोधात अपलोड करित होते. पोस्ट येणाऱ्या कमेन्ट वाढत असल्याने इंस्टग्रामवर आरोपी देवांशूचे पोस्ट वार आणखीच भडकले. त्यामुळे आरोपीगेल्या अनेक दिवसांपासून देवांशूची हत्या करण्याच्या प्रयत्नात होते.



अनेकवेळा त्यांनी देवांशूला हेरून त्याची हत्या करण्याचा प्रयत्न सुध्दा केला परंतु, या ना त्या कारणाने आरोपींचा प्रयत्न फसला. त्यामुळे आरोपी देवांशूचा गेमकरण्याची संधी शोधत होते. मंगळवार ७ मे रोजी सायंकाळी गोपाल नगर भागात देवांशू आरोपींच्या तडाख्यात सापडला. आरोपींनी एकापोठ चाकूने त्याच्यावर सपासप वार केले. त्यामुळे देवांशू रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला.

गोपाल नगरात देवांशूचे हत्याकांड झाल्यानंतर राजापेठ डीबीस्कॉड, क्राईम ब्रांच, सीपी स्पेशल स्कॉडने युध्दपातळावर आरोपींची शोधमोहिम सुरू केली.

बहुतांश आरोपी हे बाहेरगावी पळून गेले. अशातच राजापेठ पोलिसांनी मंगळवारी रात्रीत रेल्वेने अन्य शहरात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या राज आठवले, ओम खडसे, हर्षद जाधव या तिघांना अटक केली. आज ७ मे रोजी पोलिसांनी अन्य दोन अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले. पोलिस आरोपींचा कसून शोध घेत आहेत.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# भारताच्या 'स्काल्प' मिसाईलचा मारा चिनी डिफेन्स सिस्टीमचे वाजले बारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नवी दिल्ली–** भारताने पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर कठोर पावले उचलत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले आहेत. भारताने सुमारे ९ दहशतवादी तळांवर ब्रह्मोस आणि 'स्काल्प' सारख्या अचूक मिसाईलने म्हणजेच क्षेपणास्त्रांनी हल्ले केल्याचे सांगितले आहे.



या कारवाईत पाकिस्तानने अद्याप तरी २६ दहशतवाद्यां च्या मृत्यूची आणि ३८ जणांच्या जखमी होण्याची कबुली दिली आहे; मात्र मृतांची संख्या ९० हून अधिक असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या हल्ल्यावेळी चीन व तुर्कीच्या मदतीने पाकिस्तानने उभ्या केलेल्या डिफेन्स सिस्टीमला 'स्काल्प'ने बेमालूम चकवा दिला व आपले लक्ष्य गाठण्यात यश मिळवले!या हल्ल्यांमध्ये भारताने फ्रान्समध्ये विकसित केलेल्या 'स्काल्प' क्रूझ मिसाईलचा वापर केला, जी राफेल लढाऊ विमानातून डागली जाते. 'स्काल्प' ही एक स्टील्थ मिसाईल असून तिची श्रेणी ५०० किमीहून अधिक आहे. या मिसाईलमध्ये रडारला चकमा देण्याची क्षमता आहे, जी यावेळी प्रभावी ठरली आहे. पाकिस्तानच्या चिनी आणि तुर्की मदतीने उभारलेल्या डिफेन्स सिस्टीमसाठी ही मिसाईल ट्रॅक करणे शक्य झाले नाही. यामुळे चीनकडून पुरवले गेलेले क्ट–९ आणि ङ्ध–८०/क्ट–१६ डिफेन्स सिस्टीम पूर्णपणे निष्प्रभ ठरले आहेत.

या हल्ल्यांदरम्यान भारताने अत्यंत काटेकोर आणि अचूक तंत्रज्ञान वापरले. जमिनीच्या अत्यंत जवळून उडणार्या 'स्काल्प' मिसाईल्समुळे पाकिस्तानी रडार आणि इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सिस्टीम मिसळल्या. तसेच, भारताने इलेक्ट्रॉनिक डिकॉयचा वापर केला असण्याची शक्यता असून त्यामुळे पाकिस्तानच्या संरक्षण यंत्रणांमध्ये गोंधळ निर्माण झाला असावा.भारताच्या या हल्ल्यांनी केवळ दहशतवादी तळांचा नाश केला नाही, तर पाकिस्तानच्या संरक्षण व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत केला आहे. दहशतवाद्यां च्या मृत्यूची आणि ३८ जणांच्या जखमी होण्याची कबुली दिली आहे; मात्र मृतांची संख्या ९० हून अधिक असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या हल्ल्यावेळी चीन व तुर्कीच्या मदतीने पाकिस्तानने उभ्या केलेल्या डिफेन्स सिस्टीमच्या अपयशामुळे पाकिस्तानला आता पुढील पावले उचलताना अधिक सावध राहावे लागणार आहे. ही कारवाई केवळ सैनिकीदृष्ट्या नव्हे तर सामरिक, तांत्रिक आणि मनोवैज्ञानिकदृष्ट्याही प्रभावी ठरली आहे.

# भारत, पाकिस्तानात जाऊ नका

## अमेरिका, चीनसह बड्या देशांनी दिल्या नागरिकांना सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि ८ नवी दिल्ली–**

ऑपरेशन सिंदूर हाती भारतीय सैन्याने पाकिस्तानवर स्ट्राईक केला आहे. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरातील ९ दहशतवादी ठिकाणांना टार्गेट करून भारताने पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर दिले आहे. मात्र ऑपरेशन सिंदूरनंतर दोन्ही देशात आणखी तणाव वाढला आहे. भारताने सीमाभागातील सर्व राज्यात सुरक्षा वाढवली आहे. त्याशिवाय दिल्लीत उच्चस्तरीय बैठकांचा सपाटा सुरू आहे. पाकिस्ताननेही या हल्ल्यानंतर एलओसीवर सातत्याने गोळीबार सुरू केला आहे. त्यामुळे भारत–पाकिस्तान यांच्यात युद्धाचे सावट आहे. यातच बड्या देशांनी त्यांच्या नागरिकांना भारत–पाकिस्तानात प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे.अमेरिका, ब्रिटन यांनी मार्गदर्शक सूचना जारी करत भारत आणि पाकिस्तानातील भागात प्रवास करू नका असा सल्ला दिला आहे.



लष्करी हालचाली आणि हवाई क्षेत्र बंदी या शीर्षकाखाली पाकिस्तानातील अमेरिकन दूतावासाने नागरिकांना सूचना दिल्या आहेत. दहशतवाद आणि सशस्त्र दलाच्या संघर्षाच्या शक्यतेमुळे भारत पाकिस्तान सीमेत आणि नियंत्रण रेषेच्या परिसरात अमेरिकन नागरिकांना प्रवास करू नका असं सांगण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर पाकिस्तानातील हवाई क्षेत्र बंद करण्यात आले आहे. याठिकाणी अनेक उड्डाणे रद्द करण्यात आलीत. त्यामुळे अमेरिकेच्या दूतावासाने अमेरिकन नागरिकांना सुरू असलेल्या संघर्षाच्या परिस्थितीत सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा असा सल्ला दिला आहे. अमेरिकेसह ब्रिटननेही त्यांच्या नागरिकांना भारत–पाकिस्तान सीमेपासून १० किमी आणि नियंत्रण रेषेच्या १६ किमी अंतरावर प्रवास करू नका असं सांगितले आहे. आम्ही सध्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. ब्रिटीश नागरिकांनी योग्य त्या सूचनांचे पालन करावे असं सांगण्यात आले आहे. चीननेही त्यांच्या नागरिकांना भारत–पाकिस्तान यांच्यातील संघर्षात या दोन्ही देशात प्रवास टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### १०० हून अधिक दहशतवादी ठार

पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निरपराध लोकांचा मृत्यू झाला होता. अनेक माताभगिनींचे कुंकू (सिंदूर) त्या दिवशी पुसले गेले. कर्त्या माणसांवर दहशतवाद्यांनी घातलेल्या घाल्याने अवघा देश पेटून उठला. त्या कुंकवाची आण घेऊन भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे मंगळवारी मध्यरात्रीनंतर, बुधवारची पहाट उजाडत असताना अवघ्या पंचवीस मिनिटांत पाकिस्तानातील नऊ ठिकाणचे दहशतवादी तळ क्षेपणास्त्रांचा मारा करीत उद्ध्वस्त केले, तसेच त्यातील १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केला. या भीम पराक्रमानंतर देशवासीयांनी लष्कराला सलाम केला.

# ऑपरेशन सिंदूर मध्ये नागपूर विदर्भाची थेट भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नागपूर–** पाकिस्तानमध्ये हाहाकार माजविणाऱ्या आणि उभ्या जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये नागपूरविदर्भाने अत्यंत गौरवास्पद भूमिका बजावल्याची माहिती आहे. नागपूर, विदर्भानेच शक्तिशाली स्फोटकांच्या रूपात थेट पाकिस्तानमध्ये शिरून कायम लक्षात राहिल, असा धडा पाकिस्तानला शिकवला आहे. नाव न छापण्याच्या अटीवर लोकमतला ही महत्वपूर्ण माहिती शीर्षस्थ सूत्रांनी दिली आहे.




उल्लेखनीय असे की, भारतीय लष्कराची खरी ताकद नागपूर–विदर्भात आहे. नागपूर आणि भंडाऱ्यात ऑर्डनन्स फॅक्टरी आहे. तर वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथे केंद्रीय दारूगोळा भांडार आहे. आशिया खंडातील सर्वात मोठा असलेल्या वर्धेच्या या भांडारात अतिशक्तिशाली दारुगोळा साठवला जातो. भंडाऱ्यात अतिउच्च क्षमतेची स्फोटके तयार केली जातात. तर नागपूरच्या सोलर इंडस्ट्रीमध्ये लष्करासाठी विध्वंसक स्फोटके, ड्रोन, मिसाईल, रॉकेट लांचरची रसद तयार केली जाते. अर्थात शत्रू देशांची दाणादाण उडवणाऱ्या भारतीय लष्कराला नागपूर–विदर्भातील अतिशक्तिशाली दारुगोळ्याची नियमित भक्कम साथ असते.

भारताला संपवण्याची वल्गना करणाऱ्या पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांच्या म्होरक्यांना 'घर मे घूंस के मारना' काय असते, त्याचीही प्रचिती दिली. दहशतवादी संघटनांशी संबंधित असणाऱ्यांच्या सात पिढ्यांना धडकी भरविणाऱ्या या एयर स्ट्राइक मध्ये लष्कराकडून नागपूर विदर्भातील दारूगोळा मोठ्या प्रमाणात वापरण्यात आल्याचे उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले आहे.

# उद्धव ठाकरे 'धनुष्यबाणा'साठी पुन्हा सक्रिय याचिकेवर सुनावणी घेण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नवी दिल्ली :–** मुंबई महानगर पालिकेसह महाराष्ट्रातील तमाम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा होताच उद्धव ठाकरे शिवसेनेचे मूळ चिन्ह मिळविण्यासाठी सक्रिय झाले आहेत. शिवसेनेचे नाव आणि निवडणूक चिन्हाच्या याचिकेवर लवकरात लवकर सुनावणी घेण्याची मागणी त्यांचे वकील कपिल सिब्बल यांनी बुधवारी न्यायालयाकडे केली.



केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्याचा निर्णय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उन्हाळ्याच्या सुटीत सुनावणी घेण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही न्या. सूर्यकांत आणि न्या. एन. कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठाने कपिल सिब्बल यांना दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाल्यानंतर 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाच्या याचिकेवर तातडीने सुनावणी होणे गरजेचे झाले असल्याचे मत कपिल सिब्बल यांनी न्यायालयापुढे मांडले.

निवडणूक आयोगाने मूळ पक्ष आणि चिन्ह शिंदेगटाला दिले आहे. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे. आमदार आणि खासदारांची संख्या जास्त आहे म्हणून पक्षावर दुसऱ्याला अधिकार देता येत नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयानेच दिला आहे, ही बाबही सिब्बल यांनी खंडपीठाच्या लक्षात आणून दिली.

### सूचिबद्ध करणार

राष्ट्रवादी काँग्रेसप्रमाणे उद्धव गटाकडेसुद्धा पक्ष आणि चिन्ह आहे. आगामी निवडणूक त्यावर लढावी. स्थानिक निवडणुकांमध्ये मतदार निवडणूक चिन्हाला फारसे महत्त्व देत नाही. यामुळे यावर सुट्यांपूर्वी सुनावणी होणे अवघड आहे. मात्र, हा महत्त्वाचा विषय असल्यामुळे उन्हाळ्याच्या सुटीत सूचिबद्ध करू, असे न्या, सूर्यकांत यांनी स्पष्ट केले आहे. उन्हाळी सुटीत पाच ते सहा खंडपीठ बसणार असल्याची माहिती ज्येष्ठ अधिवक्ता सिद्धार्थ शिंदे यांनी दिली आहे.

# जिल्हा परिषद मध्ये पहिल्या दिवशी ८ विभागात १०३ बदल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती** – जिल्हा परिषदेत पहिल्यांच दिवशी आठ विभागातील १०३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या समुपदेशनानेकरण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रशासकीय ३६, विनंती ६३ व ४ आपसी बदली करण्यात आली आहे. सीईओ यांच्या उपस्थितीत कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया राबविण्यात आली.

जिल्हा परिषदेत कर्मचारी बदली प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. पहिल्याच दिवशी सामान्य प्रशासन विभाग, पशु संवर्धन, ग्रामिण पाणी पुरवठा, बांधकाम, कृषी, शिक्षण, वित्त, महिला व बालकल्याण विभाग आदी विभागातील कर्मचाऱ्यांच्याबदली प्रक्रिया बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये पशुसंवर्धन पर्यवेक्षक, महीला बालकल्याण पर्यवेक्षक, बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता, स्थापत्या अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभागात कनिष्ठ अभियंता, सामान्य प्रशासन विभागात सहायक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरीष्ठ सहायक, कनिष्ठ सहायक आदी कर्मचाऱ्यांचा बदली प्रक्रियेत सहभाग होता. अशा ३६ प्रशासकीय, ६३ विनंती व चार आपती बदल्या अशा १०३ बदल्या करण्यात आल्या आहेत. आज गुरुवार रोजी आरोग्यविभागातील बदली प्रक्रिया राबविली जाणार असून शुक्रवारी पंचायत विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणार आहे. या बदली प्रक्रियेदरम्यान सीईओ संजिता महापात्र, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास मरसाळे, उपशिक्षणाधिकारी बुध्दभुषण सोनोने, कृषी अधिकारी तोडकर, कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, सुनिल जाधव आदींची उपस्थिती होती. बदली प्रक्रियेकरिता सामान्य प्रशासन विभागातील पंकज गुल्हाणे, निलेशतालन, सुजितगावंडे, श्रीकांत मेश्राम, नितिन माहोरे, हेमंत यावले यांच्यासह संबधित विभागाचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राज्यात तीन–चार दिवस अवकाळी पावसाचे सावट, विदर्भात 'यलो अलर्ट'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८पुणे : –** राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाचे सावट अजून तीन ते चार दिवस कायम राहणार आहे. विशेषत: विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात आणि कोकणच्या काही भागात वादळीवारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात जोरदार पाऊस पडणार आहे.

दरम्यान हवामान विभागाने राज्याच्या बहुतांश जिल्ह्यात 'यलो अलर्ट'जारी केला आहे. या पावसाचे सावट असल्याने उन्हाचा आणि उकाड्याचा तडाखा कमी झाला आहे. मागील आठवड्यापर्यंत उन्हाचा तडाख्यामुळे अगदी ४५ अंशापर्यंत किमान तापमानाचा पारा पोहचला होता. तो आता ४० अंशावर आला आहे. बुधवारी अकोला शहराचे तापमान ४०.३ अंश नोंदवले गेले. हे राज्यात सर्वाधिक तापमान होते.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या मध्य प्रदेश भागात हवेच्या वरच्या भागात चक्रीय स्थिती आहे. तर दक्षिणपूर्व राजस्थान ते उत्तर झारखंड पार करून उत्तर पश्चिम मध्यप्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, उत्तर छत्तीसगडपर्यत द्रोणीय स्थिती आहे. उत्तर दक्षिण भागापासून सुरू झालेली आणखी एक द्रोणीय स्थिती तेलंगणापासून गल्फ ऑफ मनारपर्यत पोहचली आहे.(रॉयल सीमा व तामिळ नाडू पार करून ) सर्वात महत्वाचे म्हणजे उत्तर अरबी समुद्र ते पश्चिम मध्य प्रदेश पार करून गुजरातपर्यत आणखी एक द्रोणीय स्थिती सध्या कार्यरत आहे. या सर्व परिणामामुळे राज्यात अवकाळी पाऊस सुरू झाला आहे. कोकणात या पावसाचे प्रमाण कमी असले तरी विदर्भात मात्र राज्याच्या इतर विभागाच्या मानाने अवकाळी पाऊस जास्त राहील. त्यानंतर मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात अवकाळी पाऊस चांगलाच बरसणार आहे.

### असे आहेत जिल्हानिहाय अवकाळी पावसाचे 'यलो अलर्ट'

पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नाशिक घाटमाथा, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट माथा,कोल्हापूर, कोल्हापूर घाटमाथा, सातारा घाटमाथा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती,बुलढाणा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, यवतमाळ, वर्धा, वाशिम, यवतमाळ.

# रेशनचे धान्य उचलण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ, ग्राहकांना मोठा दिलासा

## जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी राज्य सरकारकडे मुदतवाढीसाठी केली होती मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** राज्य सरकारने रेशनवरील धान्य वाटपासाठी पुढील महिन्याचे धान्य आदल्या महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंतच उचलावे, असे सक्त निर्देश दिले होते. मात्र भारतीय अन्न महामंडळाकडून धान्याचा पुरवठा वेळेत न झाल्याने जिल्ह्यातील मे महिन्याचे सुमारे ८ हजार टन धान्य उचलता आले नव्हते. परिणामी ग्राहक धान्यापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी राज्य सरकारकडे मुदतवाढीसाठी मागणी केली होती. त्यानुसार आता राज्य सरकारने मे महिन्याचे धान्य उचलण्यासाठी १७ मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.केंद्र सरकारच्या निर्देशानुसार पुढील महिन्याच्या धान्यवाटपासाठी आदल्या महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत धान्य उचलावे, असे आदेश राज्य सरकारने सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच अन्नधान्य वितरण अधिकारी यांना दिले आहेत. धान्य उचलण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असेही राज्य सरकारतर्फे सांगण्यात आले होते. या आदेशाचा फटका जिल्ह्यातील



धान्यवाटपावर होण्याची शक्यता होती. जिल्ह्यात महिन्याला १४ हजार टन धान्य उचलावे लागते. त्यानुसार मे महिन्याचे धान्य ३० एप्रिलपर्यंत उचलावे लागणार होते. मात्र, भारतीय अन्न महामंडळाकडून धान्याचा पुरवठा न झाल्याने २८ एप्रिलपर्यंत केवळ ६ हजार टन धान्याची उचल झाली होती.राज्य सरकारच्या निर्देशांनुसार दोन दिवसांत ८ हजार टन धान्य उचलणे शक्य नव्हते. हे धान्य न उचलल्यास ग्राहकांना त्याचे वितरण करता येणार नव्हते. परिणामी अनेक ग्राहक धान्यापासून वंचित राहण्याची शक्यता होती. याचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी धान्य उचलण्यासाठी मुदतवाढ मिळावी, अशी मागणी राज्य सरकारकडे केली होती. त्यानुसार राज्य सरकारने मे महिन्यातील भारतीय अन्य महामंडळाकडे धान्य उचलण्यासाठी ३ ते १७ मे अशी १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे.

# काश्मीरच्या पर्यटनाला १५ दिवसांत 'अच्छे दिन'

## 'ऑपरेशन सिंदूर'चा गर्वच; पर्यटन क्षेत्राकडून स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८मुंबई :–**'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानातील दहशतवाद्यांचा खात्मा केल्यानंतर देशभरात सर्वच स्तरांतून समाधान व्यक्त होत आहे. पर्यटन क्षेत्रातील मान्यवरांनीही हा हल्ला म्हणजे अभिमानाचा व गर्वाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया दिली. काही विमानांच्या 'टेक ऑफ'वर नियंत्रण आल्याने पुढील १० दिवसांतील सहली रद्द केल्या आहेत. मात्र, १५ दिवसांनी स्थिती पूर्ववत झाल्यावर काश्मीरच्या पर्यटनाला 'अच्छे दिन' येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



'महाराष्ट्र टूर ऑर्गनायझर्स असोसिएशन'चे अध्यक्ष विश्वजित पाटील यांनी सांगितले की, 'ऑपरेशन सिंदूर'बद्दल भारतीय म्हणून गर्व आहे. सध्या काश्मीरमधील पर्यटन क्षेत्र नाही म्हटले तरी विस्कळीत झाले आहे. आता सीमेजवळील म्हणजे श्रीनगर, जम्मू, चंडीगड, अमृतसर आणि अहमदाबाद विमानतळे बंद आहेत. आपल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून काय प्रतिक्रिया येते किंवा आणखी काही ऑपरेशन्स आहेत का? याबाबत आपण अनभिज्ञ असल्याने 'वेट अँड वॉच'ची भूमिका आहे. हिमाचल प्रदेशमध्ये जाण्यापूर्वी पर्यटक सगळ्या गोष्टी तपासून पाहत आहेत. वैष्णोदेवी येथेही सारखीच परिस्थिती आहे.

# वीजवितरण कंपनी विरोधात शिवसैनिक पुकारणार एल्गार

## शिवसेना ठाकरे गटाचा महावितरणला आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अंजनगावसुर्जी**

आधीच उन्हाळ्याचे दिवस असताना शहरासह तालुक्यातील जनतेला वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा भरमसाठ येणारे वीज बिल यामुळे ग्राहक त्रस्त असताना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी ही ग्राहकांना वीज बिल भरून सुद्धा सुविधा देत नाही. त्यामुळे तालुक्यातील ग्राहक त्रस्त झाले आहेत.



सद्यःस्थिती ग्रामीण व शहरी भागात रात्री बे रात्री वीज पुरवठा खंडित होत आहे. तक्रारी केल्यावरही वीज कर्मचारी तक्रारीचे निराकरण करत नाही असाच प्रकार शेतकऱ्यांबाबतही आहे आधीच शेतकरी कर्जबाजारी ह्या विवंचनेत असताना वीज मंडळ शेतकऱ्यांना नाहक त्रास देत आहे, वीज मंडळाकडून जर आगामी काळात मागण्या मान्य न झाल्यास वीज मंडळ विरोधात कठोर भूमिका घेऊन समस्त शिवसैनिकांकडून एल्गार पुकारला जाईल व मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात येईल, असे पत्रकार परिषदेत शिवसैनिक सचिन गावंडे यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी दिलेल्या माहितीनुसार मनमानी पद्धतीने काम करणे व वीज ग्राहक शेतकरी यांच्याप्रासून पैशाची मागणी, असे ग्राहकांच्या म्हणण्यानुसार निदर्शनात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष धुमसत आहे, तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागात विजे चा दाब असंतुलित असून उन्हाळ्यात पंखे सुद्धा चालत नाहीत. वेळोवेळी इलेक्ट्रिक उपकरणे खराब होत आहेत. शेतकऱ्यांना वेळेवर रोहित्र उपलब्ध करून देणे, लाईनवर रात्रीच्या वेळी काही तांत्रिक अडचण आल्यास तांत्रिक अडचण दूर न करता दुसऱ्या दिवशी अक्रा ते बारा वाजेपर्यंत लाईन वर पोहोचत नसल्याकारणाने शेतकऱ्यांना त्या दिवसाची वीज मिळत नाही.वीज वितरण कंपनीने तत्काळ कारवाई करावी, अन्यथा शिवसेना स्टाईलने मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात येईल असे पत्रकार परिषदेत सचिन गावंडे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला आ. गजाननराव लवटे, सचिन गावंडे, महेंद्र दीपटे सर्व शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते, अशी माहिती शिवसेनेच्या वतीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवण्यात आली आहे.

# जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळमुक्त योजनेतील कामाला वेग : जिल्हाधिकाऱ्यांचे लाभ घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

शासनाची महत्वाकांक्षी गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. ही योजना शेतजमिन सुपीक करणे आणि धरणातील पाणीसाठा वाढवणे, यासाठी उपयुक्त असल्याने शासनस्तरावर जाणीवपूर्वक राबविल्या जात आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.चांदुररेल्वे तालुक्यातील सोनगाव आणि शिवणी येथे सुरू असलेल्या कामांना जिल्हाधिकारी सौरभ कटियार, तहसीलदार पुजा



माटोडे, पाटबंधारे उपविभागीय अभियंता पी. जी. दातीर, प्रकल्प अभियंता वसंतराव पांडव यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी अमोल आमले, प्रवीण गावंडे, दिनेश आमले, प्रशांत शिरफाते, तलाठी श्री. नादणे, विजय येडे, गजानन राऊत, प्रमोद राऊत, हर्षल वानखडे, आषिश गावंडे, श्री. लव्हाळे, किशोर बैशवार, निलेश सौसाकडे, अक्षय जामदार, अक्षय भेंडे, अक्षय फतेपूरे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज चिरोडी, ता. चांदुर रेल्वे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चिरोडी पाणीपुरवठा योजनेची पाहणी करून पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेतला. चांदुररेल्वे गटसाधना केंद्र येथील पिंपल्स कला मंचच्या नाट्य अभिनय व्यक्तिमत्व विकास शिबिरास भेट देऊन मार्गदर्शन केले. तसेच चांदुर रेल्वे तहसील कार्यालय येथे सर्व विभाग प्रमुखांची कामाचा आढावा घेतला.जिल्हा परिषदेंतर्गत अंबापूर, ता. चांदुररेल्वे येथील जलयुक्त शिवारच्या कामास भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर निंभा, ता. चांदुररेल्वे येथील विठाई चॅरिटेबल ट्रस्टच्या आरओ प्लॅन्टचे उद्घाटन केले. तसेच नदी पुनर्जीवन अंतर्गत तयार केलेल्या पुलाचे उद्घाटन करून मार्गदर्शन केले. शेंदूरजना खुर्द येथील सिमेंट नाला बांधकामाची पाहणी केली.श्री. कटियार यांनी तहसील कार्यालय धामणगाव रेल्वे येथे सर्व विभाग प्रमुखांच्या कामाचा आढावा घेतला. तसेच धामणगाव रेल्वे येथे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाना शिधा पत्रिका वाटप, तसेच कोलाम समाजातील लोकांना गोल्डन कार्ड व जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. त्यानंतर मंगरूळ दस्तगीर, ता. धामणगाव रेल्वे येथील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाची कामाची पाहणी केली. तसेच चिचपूर ता. धामणगाव रेल्वे येथील जलयुक्त शिवार अंतर्गत नाला खोलीकरण कामाची पाहणी करण्यात आली.

# इंदूरचे अधिकारी तालेवार महावितरणच्या संचालकपदी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८ अमरावती**

महावितरण कंपनीचे संचालक (प्रकल्प) म्हणून सचिन तालेवार यांनी बुधवारी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते इंदूर क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून कार्यरत होते. तालेवार हे मागील २८ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.सचिन तालेवार येथील मध्यप्रदेश पश्चिमनवनियुक्त संचालक (प्रकल्प) तालेवारमुळचे नागपूर जिल्ह्याचे असून त्यांचे शालेय शिक्षण छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथे झाले आहे. विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केल्यानंतर तालेवार १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून चंद्रपूर येथे रूजू झाले. २००६ मध्ये सरळ सेवा भरतीद्वारे त्यांची कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. महावितरणच्या ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा व सुधारित वितरण क्षेत्र योजनेसह (आरडीएसएस) विविध योजनांमधून पायाभूत वीजयंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांसोबतच प्रामुख्याने सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सर्व योजनांना आणखी गती देण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

# आठ गावांतील नागरिक करताहेत खड्डेमय रस्त्याचा सामना

## करजगाव-वणी ममदापुर रस्त्यावा मुहूर्त मिळेना : गावकरी त्रस्त : जनआंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८तिवसा २८**

तिवसा तालुक्यातील करजगाव, जावरा फत्तेपूर, रस्त्यास वणी सुलतापुर रस्ता पूर्णपने खड्डेमय झाला असून रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे परिसरातील नमस्कारी, काटसुर, इसापूर, सुलतानपुर वरुडा, दापोरी आदी गावातील नागरिकाना सुद्धा रस्त्यावरील जीवघेण्या खड्यांचा सामना करावा लागत आहे.



१८ कि.मी. अंतराचा हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग सहा पासून ममयापूर मार्गे गेला असूनतिवसा-चांदूरबाजार राज्यमहामार्गं करजगावं वरून जोडल्या गेला आहे. त्यामुळे या रस्त्यावरील आठ ते दहा गावातील शेकडो नागरिकांना आपला जीव मुठीत धरून दररोज तिवसा येथे तालुक्याच्या ठिकाणी ये-जा करण्याकरिता जीवघेण्या प्रवासाचा सामना करावा लागत आहे. रस्त्यालगत मोठ्या प्रणावर वाळू घाट असल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून, रस्त्याची पूर्णपणे चाळणी झाली आहे. रस्त्याने बैलबंडीसह साधे पायीचालणे सुद्धा कठीण झाले आहे. नागरिकांना अनेक छोट्या मोठ्या अपघातांना सामोरे जावे लागत आहे. परिसरातील नागरिकांकडून वारंवार रस्ता दुरुस्तीची मागणी होत होती वणी, सुलतानपुर रस्त्याची सुद्धा तिच अवस्था असल्याने ५० लाख रुपयाचा निधी तत्कालीन आमदार अँड. यशोमती ठाकूर यांच्या प्रयत्नातून जि.प. अमरावती यांच्या कडून मंजूर करण्यात होता. परंतु ऐन वेळेवर विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता लागू झाल्यामुळे तूर्तास रस्ता दुरुस्तीच्या प्रक्रियेस ब्रेक लागले होते. विधानसभा निवडणुका होवून चार-पाच महिने उलटून सुद्धा शासन स्तरावरून रस्ता दुरुस्तीची प्रक्रिया गुलदस्त्यात असल्याने नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे रस्ता नुतनीकरनाच्या प्रक्रिया तातडीने पूर्ण करून, येत्या पंधरा दिवसामध्ये रस्ता नुतनीकरणाच्या कामाला सुरवात करण्यात यावी, अन्यथा अन्नत्याग आंदोलनाच्या स्वरूपातून लवकरच जन आंदोलन उभारणार असल्याचा इशारा सामाजीक कार्यकर्ते मुकुंद पूनसे यांनी एका निवेदनातून जिल्हाप्रशासनास दिला आहे. यावेळी ग्रा.प.सदस्य विनोद मसलदी, हैबतराव गाडगे, रवी जवंजाळ, दसरथ कठाणे, शाम कोडे, प्रकाश गाढवे, विनोद मांडे, सुधीर लवनकर, निवृत्ती मुकदम उपस्थित होते.

# रेल्वेस्थानकावर चोरट्यांचा धुमाकूळ

## मोबाईल सह प्रवाशाच्या बॅगा पळविण्याचे प्रकार वाढले : रेल्वे पोलीस कुंभकर्णी झोपेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८बडनेरा**

बडनेरा रेल्वेस्थानकावर चोरट्याचा धुमाकूळ झाला असून प्रवाशांचे दागिने, मोबाईल, नगदी रक्कम तसेच बॅग उडवणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून सुरक्षेच्या नावाखाली कर्तव्य बसवणारे पोलिस तसेच रेल्वे सुरक्षा दल त्यांच्याशी लागेबांधे असल्याचे दिसून येत आहे. त्यणिमी चोरट्यांचा सामना करत प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. रेल्वेस्थानकावर प्रवेश केल्या नंतर महिला प्रवाशांचे दागिने व मोबाईलसह नगदी रक्कम व



त्यांच्या बॅगा हातोहात लंपास करण्यात येतात. चोर हे पटाईत असल्याने तर रेल्वे पोलिस मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे.बडनेरा रेल्वेस्टेशन हे महत्वाचे ठिकाण असून याठिकाणी अनेक मोठ्या प्रमाणात रेल्वे अनेक ठिकाणी जातात. यामुळे येथे हजारो प्रवासी मोठ्याप्रमाणात प्रवास करतात या गर्दीचा फायदा घेऊन चोरटे आपली संधी साधताना दिसतात. यामुळेअनेक प्रवाशांचे मोबाईल हातातून घेऊन पळ काढतात. विना तिकिट प्रवासी प्लॅटफॉर्मवर येण्याची हिंमतदेखील दाखवत नाही; मात्र चोरट्यांना रेल्वे स्थानकावर प्रवेश कसा मिळतो, असा प्रश्नदेखील उपस्थित होतो. त्यामुळे सर्वसामान्य प्रवासीवर्गात असलेल्या चोरीच्या घटना घडल्या जात आहे. प्रवासी वर्ग सुरक्षित नाही.प्रवाशाला तक्रार करायची वाटल्यास कुठे झंझट नको म्हणत पुढचा प्रवास सुरू करतो, चोरी गेलेले वस्तू परत तसेच मिळत नसल्यामुळे प्रवासी वर्गात नाराजीची भावना असल्याचे दिसून येते. तरी याकडे रेल्वे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे, अशी मागणी प्रवासी वर्गातून ऐकण्यास मिळत आहे.

# आयुष्य जमानारे याचा अमरावती विभागात मेरीट आल्याबद्दल सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

एचएससी बोर्डाच्या अर्थात १२ वीच्या परीक्षेत साई नगर प्रभागातील अमरावती विभागीय बोर्ड मधून विज्ञान शाखेतून प्रथम आल्याबद्दल आयुष्य अमोल जामनारे (९६.३३%) यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील शैक्षणिक कारकीर्द उज्वल आणि यशमय होण्यासाठी



हार्दिक शुभेच्छा दिल्या .कठोर परिश्रम आणि समर्पणाने आयुष्यने मिळवलेले हे यश खरोखर कौतुकास्पद आहे. हा टप्पा तुझ्यासाठी उज्वल भविष्याचा पाया असून पुढे अनंत संधी आयुष्यची वाट पाहत आहेत. पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या .यापूर्वी दहावीच्या परीक्षेत सुद्धा आयुष्य मेरिट आला होता , हे उल्लेखनीय !यावेळी स्थायी समिती माजी सभापती तुषारजी भारतीय , माजी महापौर चेतन गावंडे , राजलक्ष्मी बँक मॅनेजर धनंजय भगत , अमोल जामनारे तसेच सौ जामनारे उपस्थित होते.

# इतवारा उड्डाण पूल मुद्दा; डॉ. अलीम पटेलांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

९७-१८ या आर्थिक वर्षात चित्रा चौक- इतवारा उड्डाण पुलाचे बांधकाम सुरू केले होते. दोन वर्षात हा उड्डाणपूल पूर्ण होईल, असे संबंधित कारनाम्यात नमूद होते. परंतु, सहा वर्षे झाले तरी पुलाचे बांधकाम पूर्ण झाले नाही. ठेकेदार आणि प्रशासन निधी नसल्याचे कारण पुढे करत आपली जबाबदारी झटकत आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी डॉ. अलीम पटेल यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. तसेच १५ दिवसांच्या आत काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी निवेदनातून दिला आहे.निवेदनानुसार, निधी उपलब्धकरून काम पूर्ण करणे ही शासन प्रशासनाची जबाबदारी आहे. बांधकाम विभागाने या पुलाचे बांधकाम लवकर पूर्ण होण्याकडे दुर्लक्ष केले. या संदर्भात जानेवारी २०२५ रोजी पत्र दिले होते. तसेच पालकमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांना प्रत्यक्ष भेटून या विषयावर २८ मार्चला पत्र दिले होते. पुलाचे बांधकाम अर्धवट असल्याने या भागातील गरिबांचा व्यवसायही ठप्प झाला आहे. तसेच जीवितहानी होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. सर्वसामान्य व्यक्ती शासनाला कर देतो, त्यामुळे वेळेवर काम पूर्ण करण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. १५ दिवसांत निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे.

# घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद : चांदूर रेल्वे पोलीसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे शहरात घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद केल्याची कारवाई चांदूर रेल्वे पोलीसांनी मंगळवारी (ता. ६) केली. सागर रतन पवार (वय ४० वर्ष, रा. शिवाजीनगर) असे अटक आरोपीचे नाव आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार, चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन येथे फिर्यादी नामे रितेश राजेश मुंदडा, रा. संताबाई यादव नगर यांनी ३ मार्च रोजी जबानी रिपोर्ट दिला की, फिर्यादी यांनी घराचा मागचा दरवाजा उघडून पाहीला असता तो उघडला नाही, बाहेरून कडी लावलेली दिसली म्हणुन फिर्यादी हे त्यांच्या टाईलस्च्या दुकानात गेले असता दुकानातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. दुकानातील काउंटरचे ड्राव्हर तुटलेले दिसले, त्यातील नगदी ५५ हजार रूपये दिसले नाही. तसेच किराणा दुकानातील चिल्लर ५ हजार रूपये, १ हजार रूपये किराणा माल व ५ हजार रूपयाचे नळ फिटींगचे सामान असा एकुण ६६ हजार रूपयांचा माल चोरी गेल्याचे दिसुन आले. कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करून चोरी केली अशा जबानी रिपोर्ट वरून बीएनएस कलम ३३४ (१), ३३१ (४), ३०५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला. सदर गुन्ह्याचे तपासात पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे येथे माहीती मिळाली की, घरफोडी करणार आरोपी नामे सागर रतन पवार हा त्याचे विना क्रमांकाच्या मोटर सायकल ने अमरावती रोडवरून शिवाजीनगर, चांदूर रेल्वे कडे



येत आहे. अशा माहीतीच्या आधारे सदर आरोपी यास विरूळ चौक, चांदूर रेल्वे येथे नाकाबंदी लावून पोलीस स्टॉफच्या मदतीने त्यांस ताब्यात घेतले. चांदूर रेल्वेतील घरफोडीचा गुन्हा घडल्यापासुन सदर आरोपी हा घरून फरार असल्याने सदर गुन्हा त्यानेच केल्याचा दाट संशय असल्याने सदर आरोपीस या गुन्ह्याच्या संबंधाने विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्याचे ताब्यातुन गुन्ह्यात चोरी गेलेले नगदी ४ हजार २३० रूपये व मोटर सायकल एमएच ३१ डीजे ६०३२ किं. १ लाख रूपये असा एकुण १ लाख ४ हजार २३० रूपयांचा जप्त करण्यात आले आहे. तसेच त्याने दिलेल्या कबुली वरून वर्धा जिल्ह्यातील आर्वी पोलीस स्टेशन हद्दीतील एक गुन्हा उघडकीस आणण्यात आला. सदरची कार्यवाही प्रभारी पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस निरीक्षक अजय आकरे, पीएसआय नंदलाल लिंगोट, पोलीस अंमलदार शिवाजी घुगे, प्रविण मेश्राम, योगेश नेवारे, प्रशांत ढोके, अलीम पटेल, प्रियंका कोकाटे यांनी केली

**पोलीसांच्या गाडीवर दगड घेऊन धावले?**

अटक केलेला सदर आरोपी हा बुधवारी दुपारच्या वेळेस पोलीसांच्या गाडीत असतांना एका विशिष्ट समाजाच्या काही महिला मंडळी ह्या अटकेचा विरोध करीत पोलीसांच्या वाहनाकडे दगड हातात घेऊन धावल्याची चर्चा शहरात आहे. यावेळी चालकाने मुख्य मार्गाने वेगाने वाहन पुढे नेल्याने अनर्थ टळल्याचे बोलल्या जात आहे. यावर पोलीसांकडून कुठलीही कारवाई न झाल्याने आश्चर्य सुद्धा व्यक्त होत आहे.

# परतवाडा - मेळघाट - खंडवा रस्त्यांवर चाललंय तरी काय?

## अवघ्या २४ तासांत तीन अपघात : ट्रॅव्हल्सनंतर चारचाकी दरीत उतरली, आरटीओ वाहन झाडावर आदळले, सुदैवाने जीवित हानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मेळघाट**

मंगळवारी सायंकाळी सुसाट वेगाने धावणाऱ्या ट्रॅव्हल्सचा मांगिया गावानजीक अपघात झाल्यानंतर, कोलकासनजीक चारचाकी दरीत कोसळून त्यातील प्रवासी किरकोळ जखमी झाले. बुधवारी सकाळी अपघातग्रस्त ट्रॅव्हल्सची तपासणी आणि चौकशी करण्यासाठी जाणाऱ्या आरटीओच्या चारचाकी वाहनालाही अपघात झाला. यात चालकासह अधिकारी किरकोळ जखमी झाल्याची



प्राथमिक माहिती पुढे आली आहे. २४ तासांमध्ये तीन अपघातांची मालिकाच परतवाडा-धारणी-खंडवा मार्गावर घडली.

धारणी-परतवाडा मार्गावर सेमाडोहच्या भवई घाटात अमरावतीहून धारणीकडे जाणाऱ्या आरटीओ वाहनाला अपघात झाला. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. खराब रस्त्यावर भरधाव वाहनाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

परतवाडा-धारणी मार्गावर मध्य प्रदेशातून ये-जा करणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स मोठ्या प्रमाणात आहेत. यात प्रवासी गुरांसारखे कोंबून नेले जातात. एसटी बसपुढे प्रवासी मिळावे, यासाठी खासगी ट्रॅव्हल्सची जीवघेणी शर्यत रस्त्यावरची नेहमीच बघायला मिळते.याच मार्गावर सेमाडोहनजीक जवाहर कुंड पुलाखाली खासगी ट्रॅव्हल्स कोसळून पाच जण ठार झाले होते. जीवाचा थरकाप उडविणाऱ्या आठवणींचा उजाळा अनेकांना झाला. चालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेला अपघात पुन्हा झाल्याने यावर नियंत्रण कोणाचे, हा प्रश्न पुढे आला.

मंगळवारी सायंकाळी ट्रॅव्हल्स पलटण्यापूर्वी नागपूरहून बऱ्हाणपूरसाठी निघालेली ही खासगी ट्रॅव्हल्स मेन पट्टा तुटल्याने परतवाडा येथे दुरुस्त करण्यात आली. त्यामुळे एक तास उशीर झाला. त्यावर नेमण्यात आलेल्या चालकाची घाटवळणाची पहिलीच वेळ असतानाही वेळ कापण्यासाठी तो भरधाव वेगाने वाहन चालवत होता. प्रवासी त्याच्यावर ओरडले, पण काहीही परिणाम झाला नाही. अखेर मांगियानजीकच्या वळणावर बस कोसळून अपघात झाला.

# खरीपाच्या तोंडावर राज्यातील कृषी सहायकांचे असहकार आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,८अमरावती**

समान काम समान वेतन या धोरणानुसार कृषी सेवकांना कृषी सहाय्यक म्हणून नियमित करावे, कृषी सहायकांच्या पदनामात बदल करावा, योजनांच्या अंमलबजावणीसाठी पायाभूत सुविधा पुरवाव्यात.

तसेच, पदोन्नती मिळण्यासाठी आकृतीबंधात कृषी पर्यवेक्षकांच्या जागांमध्ये वाढ करावी, अशा विविध मागण्यांसाठी राज्यातील कृषी सहायकांनी ५ ते १५ मे असहकार आंदोलन पुकारले आहे.

मात्र, बुधवारपासून (दि. ७) प्रत्येक तालुका कृषी कार्यालयासमोर धरणे आंदोलन होणार आहे. तर गुरुवारी (दि. ८) सर्व कृषी सहायकांनी सामूहिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच, शुक्रवारी (दि. ९) ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. परिणामी ग्राम स्तरावर राबविण्यात येणाऱ्या कृषी विभागाच्या योजना ठप्प होणार आहेत.




> राज्य सरकारकडे पाठपुरावा करूनही प्रतिसाद मिळत नाही. या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना सुविधा पुरविता येणार नाहीत. त्यासाठी दिलगीर आहोत.
>
> **– विलास रिंढे, अध्यक्ष, राज्य कृषी सहायक संघटना**

मागण्या मान्य न झाल्यास १५ मेपासून संपूर्ण काम बंद आंदोलन करण्यात येईल, अशी माहिती राज्य कृषी सहायक संघटनेचे अध्यक्ष विलास रिंढे यांनी दिली.

**या आहेत कृषी सहायकांच्या प्रमुख मागण्या**

कृषी विभागाने कृषी सेवक म्हणून नियुक्ती न देता थेट कृषी सहायक म्हणून नियुक्ती द्यावी. समान काम समान वेतन या धोरणानुसार कृषी सेवकांना कृषी सहायकांइतके वेतन द्यावे. सध्या कार्यरत असलेल्या व कृषी सेवक पदाचा सहा ते एक वर्षांचा कार्यकाळ शिल्लक असलेल्या कृषी सेवकांना तातडीने कृषी सहायक म्हणून नियुक्ती द्यावी. महसूल विभागाने तलाठ्यांच्या पदनामात बदल केले मात्र, कृषी सहायकांच्या पदनामात बदल केलेला नाही. कृषी विभागातर्फे बी बियाणे, खते, औषधे अशा निविष्ठा शेतकऱ्यांना दिल्या जातात, मात्र त्यांचे वाटप करताना कृषी सहायकांना वाहतुकीची सुविधा दिली जात नाही ती द्यावी. कृषी विभागाने प्रस्तावित केलेल्या आकृतीबंधानुसार राज्यात कृषी सहायकांची ११ हजार ५०० पदे असून, कृषी पर्यवेक्षकांची सुमारे २ हजार ७०० पदे आहेत. कृषी पर्यवेक्षांकांची संख्या कमी असल्यामुळे कृषी सहायकांना बीस ते बावीस वर्षे एकाच पदावर काम करावे लागत आहे. त्यामुळे राज्य सरकारने कृषी पर्यवेक्षकांची पदे वाढवावीत.

# वीज गेली, सारे घामाघूम; या नंबरवर करा तक्रार! वीजपुरवठ्याच्या तक्रारींसाठी १९१२ टोल फ्री क्रमांक वापरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

वीजपुरवठा खंडित झाल्यास वीज कर्मचारी किंवा त्यांच्या वरिष्ठांना फोन करून वेळ वाया घालविण्यापेक्षा वीजग्राहकांनी २४ तास सुरू असलेल्या टोल फ्री क्रमांक : १९१२, १८००२३३३४३५ व १८००२१२३४३५ या तीनपैकी एका टोल फ्री क्रमांकावर वीजपुरवठा व वीज बिलासंबंधीच्या तक्रारी नोंदवाव्यात, असे महावितरणने कळविले आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार महावितरणला वेळेत व नेमक्या ठिकाणांसह मिळाली, तर ती वेळेत निकाली काढून तेथील ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य होते. २४ तासांत तक्रार नोंदविताना ग्राहकांनी त्यांचा १२ अंकी ग्राहक क्रमांक




नोंदविल्यास महावितरणला त्या ग्राहकाशी संबंधित माहिती उपलब्ध होते. त्यामुळे फॉल्ट शोधण्यासाठी वेळ वाया जात नाही.ती तक्रार थेट संबंधित शाखा कार्यालयाला वर्ग होते, तसेच तक्रारीची नोंद ऑनलाइन प्रणालीत झाल्यामुळे वीज नियामक आयोगाने घालून दिलेल्या कृती मानकांनुसार वेळेत सोडवणे बंधनकारक बनते. ज्याप्रमाणे टोल फ्री क्रमांकावर आलेल्या तक्रारींची नोंद ऑनलाइन प्रणालीत होते. त्याउलटएखाद्या वीज कर्मचाऱ्याला फोनवर आलेल्या तक्रारींची नोंद होत नाही. कारण ज्यावेळी एखाद्या भागाचा वीजपुरवठा खंडित होतो, तेव्हा एकाच वेळी त्याला अनेक फोन येतात. प्रत्येक जण त्याचे नाव, पत्ता सांगण्यात वेळ घालवतो, तसेच फोन चालू असल्यामुळे त्याला फॉल्ट शोधता येत नाही. खांबावर किंवा वीज वाहिनीवर काम करताना घेतलेला कॉल त्याच्या जिवावरही बेतू शकतो. त्यामुळे वैयक्तिक फोन करणे टाळावे.

**महावितरणचे ॲप डाऊनलोड करा**

महावितरणच्या बहुतांश ग्राहक सेवा ऑनलाइन झालेल्या आहेत. त्यासाठी ग्राहकांनी महावितरणचे ॲप प्लेस्टोअर किंवा ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करावे. यामध्ये एकापेक्षा जास्त वीज जोडण्या एकदाच नोंदणी करून हाताळता येतात. याशिवाय महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरही ग्राहक सेवा स्वतंत्रपणे दिल्या आहेत. ग्राहकांना घरबसल्या या सेवांचा लाभ घेता येतो.

# चांदूरबाजार येथे राज्यस्तरीय 'ग्रीन रन' मॅरेथॉन स्पर्धा २१ ला

## छत्रपती शंभूराजे जयंतीनिमित आयोजन १८ मेपर्यंत नोंदणीचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदूरबाजार**

छत्रपती शंभूराजे जयंती पर्वावर राज्यस्तरीय 'ग्रीन रन मॅरेथॉन' स्पधांचे २१ मे रोजी सकाळी सहा वाजता आयोजन करण्यात आले आहे.

संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी, तालुका शारीरिक शिक्षक संघटना, गो. सी. टोम्पे महाविद्यालय व तालुका डॉक्टर्स असोसिएशन यांनी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या मॅरेथर्थानमध्ये पुरुष खुला



गटासाठी ११ कि.मी.१४ वर्षांखालील मुला-मुलींसाठी तसेच डॉक्टर्स, शिक्षक व कर्मचारी गटासाठी १ कि. मी. अंतर निश्चित करण्यात आले आहे. या स्पर्धेत पुरुष खुल्या गटासाठी माजी मंत्री बच्चूकडू यांच्याकडून प्रथम बक्षीस११ हजार रुपये, द्वितीय बक्षीस ५ हजार रुपये (तालुका डॉ.असोसिएशन), तृतीय बक्षीस ३ हजार रुपये (प्रहार विद्यार्थी संघटना), तर प्रोत्साहनपर बक्षीस १ हजार रुपये क्षात्रवीर संभाजी क्रीडा युवक प्रतिष्ठानकडून देण्यात येणार आहे. १४ वर्षातील मुले व मुलीकरिता प्रथम बक्षीस १ हजार रूपये, द्वितीय बक्षीस ७०० रूपये, तृतीय बक्षीस ५००रुपये आहे. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला प्रमाणपत्र व मेडल देण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन स्पर्धेचे मुख्य संयोजक डॉ. तुषार देशमुख, संयोजक पी. डी. उईके, सहसंयोजक निखिल काटोलकर, डॉ. हेमंत रावळे, डॉ. मुकुंद मोहोड, नरेंद्र देशमुख, डी. आर. नांदूरकर, शरद नवले, प्रवीण पारधी, प्रवीण मोहोड, श्रेयश बर्वे, सुयोग गोरले, प्रतीक देशमुख, सचिन किटुकले, अभी अवसरमोल, मनिष नागले यांनी केले आहे.

# कपाशीच्या ढिगात आशा मावळल्या घरात साठवलेला कापूस ठरतोय डोकेदुखी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि,८अमरावती**

दिवाळीपासून भाववाढीची अपेक्षा ठेवून अनेक शेतकऱ्यांनी कापूस घरात साठवून ठेवला होता; मात्र अनेक दिवसांपासून साठवलेल्या कापसावर आता बारीक किडींचा प्रादुर्भाव होऊ लागला आहे.



दरम्यान, खरीप हंगामासाठी बी-बियाणे आणि रासायनिक खते खरेदीसाठी आर्थिक तरतूद करावी लागणार असल्याने शेतकऱ्यांना आता मिळेल त्या दरात कापूसविकावा लागत आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

आगामी खरीप हंगामासाठी मशागत व पेरणीची तयारी सुरू असताना, कापूस साठवून ठेवलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशाच आली आहे. सध्या कापसाला केवळ ७,६०० रुपये प्रतिक्विंटल इतकाच दर मिळत असून, अपेक्षित भाववाढ न झाल्याने शेतकऱ्यांना तोट्यात कापूस विकण्याची वेळ आली आहे. गेल्या काही दिवसांपासून भाववाढीची अपेक्षा फोल ठरली असून, शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

**खर्च जास्त, नफा कमी !**

कापसाचे उत्पादन घेण्यासाठी खर्चात वाढ झालेली आहे. कापूस वेचणीसाठी १० रुपये किलो दर मजुराला द्यावे लागतात. फवारणी व इतर खर्च वाढला. तुलनेत कापसाला भाव मिळत नसल्याचे चित्र आहे. कापसाला ७,६०० रुपये प्रति क्विंटल भाव आहे.इतर पिकांच्या तुलनेत कापसाला अधिक चांगला दर मिळेल, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली; परंतु शेवटी त्यांच्या पदरी घोर निराशाच आली आहे.

# अमरावती खरेदी-विक्री संघ काळ्या यादीत : शासकीय खरेदी करण्यास निर्बंध : सोयाबीन खरेदीत अनियमितता केल्याचा ठपका

## विदर्भ मार्केटिंग फेडरेशनची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती :**

अमरावती सहकारी शेतकी खरेदी-विक्री संघाने सोयाबीन खरेदीदरम्यान अनियमितता केल्याचा ठपका ठेवत या संस्थेला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. त्यामुळे आगामी हंगामातील कोणतीही शासकीय खरेदी करण्यास निबंध घालण्यात आले आहे. दी विदर्भ को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लिमिटेडने सदरची कारवाई केली आहे.अमरावती तालुक्यात २०२४-२५ या वर्षात नाफेडद्वारे सोयाबीन खरेदी प्रक्रिया अमरावती खरेदी-विक्री संघातर्फे राबविण्यात आली होती. ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन असताना या संस्थेकडून ऑफलाइन प्रक्रिया राबविल्याने यामध्ये अनियमितता केल्याचा ठपका होता. याची दखल घेत अशा संस्थांना काळ्या यादीत टाकण्याची शिफारस शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या वतीने दी विदर्भ को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. नागपूरला केली होती. फेडरेशनकडून जामोद, मलकापूर, पिंपळीगवळीसह अमरावती खरेदी-विक्री संघाला काळ्या यादीत टाकण्यात आल्याचा आदेश काढला. या दरम्यान या संस्थेने १२८९ शेतकऱ्यांची ऑनलाइन तूर खरेदीची नोंदणी केली आहे. यातील १२५० शेतकऱ्यांना त्यांनी खरेदीकरिता कॉल दिले आहे. त्यामुळे या संस्थेकडून तूर खरेदीची प्रक्रिया पूर्ण करून पुढील सर्व हंगामाकरिता अमरावती खरेदी-विक्री संस्थेला कोणतीही शासकीय खरेदी करण्यास कायमस्वरुपी निर्बंध घालण्यात आले आहे. तसेच हंगाम २०२४-२५ मधील तूर, हरभरा खरेदी प्रक्रियेकरिता या केंद्राची सबएजंट म्हणून केलेली नियुक्ती देखील या आदेशान्वये रद्द करण्यात आली आहे. सदरचे आदेश दी विदर्भको-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. चे कार्यकारी संचालक एस. हरीबाबू यांनी काढले.

# एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गळ्यात दिसणार आता ओळखपत्र

## प्रादेशिक व्यवस्थापकांच्या सूचना : दर्शनी भागावर घालणे बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

सर्व एसटी कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर येताना ओळखपत्र घालून येणे बंधनकारक आहे. मात्र, बहुतांश कर्मचारी ओळखपत्र घालून येत नसल्याची बाब एसटी महामंडळाच्या लक्षात आली. एसटी महामंडळाच्या नागपूर-अमरावती प्रदेश कार्यालयाने २५ एप्रिल रोजी पत्र काढले आहे. त्यात प्रत्येक कर्मचाऱ्याने कर्तव्यावर असताना गळ्यात दर्शनी भागावर ओळखपत्र घालणे बंधनकारक केले आहे. अन्यथा कारवाई होईल.

विविध प्रशासकीय कामासाठी नागरिक, प्रवासी, विद्यार्थी एसटीच्या कार्यालयात जातात. विशेष करून विभागीय व प्रदेश कार्यालयात मोठ्या प्रमाणात कर्मचारी असतात. एसटी चालक व वाहकाला गणवेश असते. तसेच गणवेशावर असलेल्या नावाच्या पट्टीवरून त्याची ओळख पटत असते. मात्र,



कार्यालयातील प्रशासकीय कारभार सांभाळणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांना गणवेश नाही. इतर कार्यालयांच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांनाही ओळखपत्र घालणे बंधनकारक आहे. याची आठवण २५ एप्रिलच्या पत्रातून करून देण्यात आली आहे.

**कारवाई होणार**

प्रत्येक एसटी कर्मचाऱ्याने दर्शनी भागावर ओळखपत्र घालणे आवश्यक आहे. याबाबत ७ मे २०१४ चे शासनाचे परिपत्रक आहे. या परिपत्रकाहीचीही आठवण करून देण्यात आली आहे. ओळखपत्र न घालणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल.

> प्रत्येक एसटी कर्मचाऱ्याने कार्यालयात ओळखपत्र घालणे बंधनकारक केले आहे. जे कर्मचारी व अधिकारी ओळखपत्र घालणार नाही. त्यांच्यावर कारवाई केली जाईल. प्रादेशिक व्यवस्थापकांचे पत्र विभागाला प्राप्त झाले आहे.
>
> **निलेश बेलसरे,विभाग नियंत्रक,अमरावती**

